
MAHMARI 19358/13/1/2000 -TC



व्ही. पी. एम्.

# दिशा

वर्ष तेरावे / अंक ५ / मे २०१२

## संपादकीय

### भारतीय चित्रपटाची १०० वर्षे

१९४७ साली भारताची फाळणी झाली. भारत स्वतंत्र झाला. स्वातंत्र्यानंतर या देशात असंख्य संस्थानिक, संस्थाने व त्यांचे कायदे अस्तित्वात होते. या सर्व संस्थानांना एकछत्री अमलाखाली आणणे अवघड होते. गोवा व हैद्राबादचा अपवाद वगळता बहुतांश नकाशा हा सरदार वल्लभभाई पटेल यांच्या अहिंसक राजकीय प्रयत्न पर्वाचे फलित होता. ही घटना सांगावयाचे कारण असे की सरदार पटेल यांच्या प्रयत्नांतून निर्माण झालेला भारत हा एक देश आहे हे त्यावेळच्या ३५-४० कोटी लोकांनी स्वीकारले. किंबहुना, अनेक संस्कृती, अनेक भाषा, अनेक बोली या सर्वांमध्ये 'हा माझा देश आहे' ही जाणीव निर्माण करणारी ती महत्त्वाची घटना होती.

१९६० ते ८० या वीस वर्षांत सर्व देशात दूरदर्शन नावाच्या प्रभावी माध्यमाने हात पाय पसरायला सुरुवात केली आणि दूरदर्शनवरची क्रिकेटची मॅच हा असाच आणखीन एक धागा या सर्व गोष्टींना एकत्र बांधणारा असा निर्माण झाला. अन्यथा भारत माझा देश आहे ही भावना नवीन पिढीत रुजवणे अवघड झाले असते.

या गोष्टींप्रमाणेच चित्रपट आणि चित्रपटांची सर्वसामान्य माणसाच्या मनावरील मोहिनी या बाबीचा एक अभ्यास म्हणून विचार करायला हवा. धुंडिराज गोविंद उर्फ दादासाहेब फाळके यांना भारतातील चित्रपट निर्मितीचा शिलेदार म्हणून आपण ओळखतो; पण 'राजा हरिश्चंद्र' हा खऱ्या अर्थाने पहिला भारतीय मूकपट त्यांनी बनवण्यापूर्वी काही प्रयत्न मदनराव पितळे, महादेव पटवर्धन, सावेदादा, हिरालाल सेन, दादासाहेब तोरणे यांनी केले होते. १९१३ या वर्षी ३ मे रोजी हा भारतीय चित्रपट मुंबईतील कॉरोनेशन या चित्रपट गृहात प्रदर्शित झाला. त्याला आज १०० वर्षे झाली आणि या शताब्दी निमित्तानेच या माध्यमाचा काही विचार करावा असे मनात आले. या पहिल्या मूकपटाचे दादासाहेब फाळके हे केवळ निर्मातेच नव्हते तर 'सब कुछ दादासाहेब' असल्याने त्यांना 'भारतीय चित्रपट सृष्टीचे जनक' असे म्हणणे योग्य ठरते. त्यांनी केवळ चित्रपट तयार केले, इतकेच नसून तर बैलगाडीत बसून चित्रपटांच्या रिळांचा प्रसारही केला.

या शंभर वर्षांत सिनेमाने भारतीय मनाला पूर्ण घेरलं आहे. त्याच्यावर घट्ट पकड मिळवली आहे. १८९५ साली परदेशात बनलेला आणि मोठमोठ्या रिळांमध्ये गुंडाळलेल्या या चित्रपटाने १९९५ पर्यंत डिव्हीडीचे स्वरूप घेतले.

(पृष्ठ क्र. २ वर)

(मुखपृष्ठावरुन - **संपादकीय**)


भारताचे भारतीयत्व टिकवून ठेवण्याची ही कला या माध्यमाला साध्य झाली, याचे कारण भारतातील सर्व भाषांमध्ये प्रादेशिक चित्रपट तर बनायला लागलेच; पण हिंदी चित्रपटांनी अ हिंदी घरांमध्ये जाऊन कमालीचा परिणाम साधला. १८५३ साली आलेल्या वाफेच्या इंजिनच्या रेलगाडीने जसा भारत जोडला तसाच चित्रपट या माध्यमानेही आपला करिष्मा दाखवला. इतिहासाचे तपशील बरेच आहेत. अर्देशीर इराणी यांनी 'आलमरा' हा पहिला बोलपट १९३१ मध्ये बनवला. तर व्ही शांताराम यांनी अयोध्येचा राजा मराठीत १९३२ मध्ये निर्माण केला. हे इतिहासातील तपशील चित्रपटावरील एखाद्या चांगल्या अशा ग्रंथात मिळू शकतील. पण १९३९ ते जवळ जवळ १९७५ या काळाला हिंदी चित्रपटांचे सुवर्ण युग म्हटले जाते. यातील 'सुवर्ण' काय आहे हा आपल्या ज्ञानात भर टाकणारा विषय आहे. बायकांनी चित्रपटात काम करणे न करणे, चित्रपटीय प्रतिमा तयार करणे आणि बाजारूपणा न येऊ देता माध्यमाच्या विकासाची सर्व दारे उघडणे, हे सर्व या काळात घडले. बंगालीतील 'सत्यजित रे' काय हिंदीतील मेहबूब खान, राज कपूर, विमल रॉय अशा अनेकांनी हा सुवर्ण युगाचा इतिहास घडवला. चित्रफिती वरील चित्र आणि काम करणाऱ्या व्यक्तीचा आवाज या विषयीचे तंत्र कसे बनवावे याचा प्रयत्न पहिल्या बोलपटापासूनच सुरु झाला. के. एल. सैगल, खेमचंद प्रकाश, पंकज मलिक अशी किती तरी नावे सहज आठवतात. पथेर पांचाली सारखा चित्रपट जसा जगतमान्य झाला तसेच इतर भाषांतील अनेक चित्रपटांबद्दल सांगता येणे शक्य आहे. जाता जाता चित्रपट कला आणि शासनाचे धोरण यांचा केवळ निर्देश करतो. एकत्र कुटुंब पद्धतीचा पुरस्कार, विभक्त कुटुंब पद्धतीचे वास्तव दर्शन, हिंसा संतप्तता यांचे प्रमाण या सर्व बाबींनी चित्रपट हे माध्यम विलक्षण ताकदवान केले.

उपरोक्त सुवर्णयुग असे ज्याला म्हटले जाते त्यामागे चित्रपटांची गोष्ट सांगण्याची कला हे रूप तर कारण होतेच, पण चित्रपटाच्या गायकांचे आणि गाण्यांचे जनमानसाशी असलेले नाते हे वेगळेच होते. बिनाका गीतमालाच्या आठवणी सांगणारे रेडिओ क्लबचे अनेक सभासद आपल्या उतार वयात या चित्रपटांनी त्यांना दाखवलेल्या स्वप्नांना शोधत जगतात. शोलेने गुन्हेगारी पार्श्वभूमीची कथा असूनही त्यातील अनेक गोष्टीमुळे रसिकांच्या मनावर राज्य केले.

अर्थात म्हणून हिंदी चित्रपटाला बॉलीवूड म्हणावे का? या चित्रपटाची चर्चा घडवावी का? असे काही विचारणारे रसिक ही भेटतात. कारण भारतीय रूप असले तरी समांतर चित्रपटांचा आणि कलात्मक चित्रपटांचा एक प्रवाह स्वतंत्रपणे वाहतांना दिसतो अशा चित्रपटांची प्रभात चित्र मंडळा सारखी अनेक व्यासपीठेही आहेत आणि मुख्य प्रवाहातील चित्रपटांप्रमाणेच यांचा ही मोठा वाटा या प्रगतीत आहे.

हलत्या चित्रपटांची मालिका, मूकपट, बोलपट, रंगीत सिनेमा, सिनेमास्कोप, डॉल्बी सीस्टीम थ्रीडी, फोरडी अशा तांत्रिक करामतींची शिडी चित्रपट अजून चढतोच आहे. याचा अर्थ कलेचे माध्यम म्हणून याचा विकास व्हायला अजूनही वाव आहे. सुरुवातीला म्हटल्याप्रमाणे विविध भाषा, संस्कृती सणवार खाणे, पिणे या सर्वांना भारतीयत्व देण्याचे आणि ते सांभाळण्याचे काम चित्रपटांनी केले, असे सरळसोट विधान दिशाभूल करणारे ठरेल. मूल्यांची घसरण, सामाजिक प्रश्न निर्माण करणे, खोट्या नाट्या कथा सांगून सवंग प्रसिद्धी मिळवणे असे किती तरी दोष या १०० वर्षातील चित्रपटांबद्दल सांगता येतील. मात्र ३ मे २०१३ रोजी सुरू झालेल्या नवीन शतकात आधिक अर्थपूर्ण आणि सामाजिक रूची जोपासणारे चित्रपट निर्माण होतील असे म्हणायला हरकत नाही.

– मोहन पाठक



व्ही.पी.एम्.

# दिशा

वर्ष तेरावे / अंक ५/ मे २०१२

**संपादक**
डॉ. विजय बेडेकर

**कार्यकारी संपादक**
श्री. मोहन पाठक

'दिशा' प्रारंभ जुलै १९९६
(वर्ष १६ वे/अंक ११ वा)

**कार्यालय**
विद्या प्रसारक मंडळ
डॉ. बेडेकर विद्या मंदिर
नौपाडा, ठाणे - ४०० ६०२
**दूरध्वनी : २५४२ ६२७०**
www.vpmthane.org

**मुद्रण स्थळ :**
परफेक्ट प्रिण्टस्,
नूरीबाबा दर्गा रोड, ठाणे.
**दूरध्वनी : २५३४ ११९१**
**२५४१ ३५४६**
Email : perfectprints@gmail.com

## अनुक्रमणिका

| | | | |
|---|---|---|---|
| १) | संपादकीय | श्री. मोहन पाठक | |
| २) | अटलांटातील दिवाळी | श्री. नरेन्द्र नाडकर्णी | ३ |
| ३) | स्वामी रामतीर्थ (लेखांक पाचवा) | श्री. शं. बा. मठ | ९ |
| ४) | बुद्धाच्या शिकवणुकीचे संचितः धम्मपद | श्री. सुभाष एंगडे | १५ |
| ५) | मला उमगलेले गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर | - गीतांजलीतून | १८ |
| ६) | श्रीरामचरितमानसः एक अमृतानुभव | प्रा. एस. एस. मुजुमदार | २२ |
| ७) | भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना | श्री. यशवंत साने | २५ |
| ८) | परिसर वार्ता | - संकलित | ३१ |

या अंकात व्यक्त झालेली मते त्या लेखकांची वैयक्तिक मते असून त्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

# व्ही. पी. एम. दिशाच्या संदर्भात

- आपण दिशा नियमित वाचा. इतरांनाही वाचायला सांगा.
- अभ्यासपूर्ण लेखांसाठी हे व्यासपीठ आहे.
- दिशा चे उद्दिष्ट विचारप्रर्वतक लेखांना व्यासपीठ पुरवावे हे आहे.
- शैक्षणिक संस्थेने असे मासिक चालवावे, याचे हे एकमेव उदाहरण आहे.
- आपण विचारप्रवृत्त लेख पाठवून दिशाला सहकार्य करू शकता.
- आपण स्वत: वर्गणीदार व्हा, इतरांना वर्गणीदार व्हायला सांगा.
- आपण वर्गणीदार असाल तर, आपली वर्गणी भरायची राहिली नाही ना, कृपया पडताळून पाहा.
- दिशाच्या संदर्भात वर्गणी, लेख पाठवावयाचे असतील तर
कार्यवाह, विद्या प्रसारक मंडळ, डॉ. बेडेकर विद्या मंदिर नौपाडा, ठाणे ४००६०२
या पत्त्यावर पाठवा. ०२२-२५४२६२७० या क्रमांकावर संपर्क साधा.
- आपण सार्वजनिक ग्रंथालयाचे संचालक असाल वा असे एखादे ग्रंथालय चालवत असाल, तर आपण सभासद होणे अत्यंत गरजेचे आहे. महाविद्यालये, शाळा यांच्या प्रमुखांनीही आपल्या संस्थेची वर्गणी पाठवावी.
- www.vpmthane.org या संकेत स्थळावर दिशाचे जुने अंक आपण पाहू शकता.
- वार्षिक वर्गणी रु. २५०/- धनादेश 'विद्या प्रसारक मंडळ A/C दिशा' या नावाने पाठवावा.

- संपादक

# अटलांटातील दिवाळी


*अटलांटातील महाराष्ट्र मंडळ व मराठी शाळा, दिवाळी यांची ही माहिती आपल्या संस्कृतीबद्दल खूप काही सांगून जाईल - संपादक*

२० ऑक्टोबर २०११ रोजी आमची अमेरिकेची पाचवी सफर सुरु झाली. आता आम्ही निघालो होतो ते जॉर्जिया राज्यातील अटलांटा शहरामध्ये. यापूर्वीच्या चारही सफरी झाल्या होत्या त्या उत्तरेकडील कनेक्टिकट राज्यात. अमेरिकेचा उत्तरपूर्व भाग आणि तेथील हवामानाचा विषय निघाला की मला बोरकरांच्या एका कवितेची आठवण येते. तेथील हवामानाच वर्णन करताना बोरकरांनी म्हंटलय. . .

"येथे विवंचक हवा बहुधा हिवाळी,
होते उबाळ क्षणी ती क्षणी पावसाळी"

मी ही त्या हवेचा धसका घेतला होता आणि त्यामुळे माझ्यासारख्या इतरही अनेकांप्रमाणे मे जून मध्ये जाऊन ऑक्टोबर अखेर स्वगृही परतायचं हा आमचा खाक्या. पण दोन वर्षापूर्वी गीतेश आणि दीपानं उत्तरपूर्वेतील या 'विवंचक' हवेला रामराम करून दक्षिणेकडे जाण्याचा निर्णय घेतला आणि आता या दक्षिणेतील राज्याचे हवामान तसे ठीक असते हे ऐकून अमेरिकेतला हिवाळा अगदी नववर्षाच्या पहाटेपर्यंत अनुभवण्यासाठी आम्ही आता इथे दाखल होतो.

गेलं वर्ष दीडवर्ष अटलांटाविषयीच्या आमच्या ज्ञानात हळूहळू भर पडत होती. सर्वप्रथम भारतीय माणसाला बरं वाटणारं इथलं हवामान आणि त्यामुळेच गेल्या २० वर्षात भरभराटीला आलेल्या या शहरात भारतीयांच प्रमाण वाखणण्यासारखं झालं आहे हे ऐकून होतो. अर्थात भारतीय मंडळी खूप असल्यामुळे भारतीय स्टोअर, भारतीय रेस्टोरंट यांचही प्रमाण भरपूर. विशेष म्हणजे कनेक्टिकटच्या तुलनेत इथे सर्व भाज्या चांगल्या मिळतात, सर्वप्रकारचे मासेही मिळतात हे ऐकून बरं वाटलं. पुढे समजलं की इथे १० मिनिटांच्या ड्राइव्हवर एक साई मंदिर आहे. या मंदिरात साजऱ्या झालेल्या होलिकोत्सवाचे फोटो पाहिले. आजकाल होळी म्हणजे फक्त दुसऱ्या दिवशीची धूळवड एव्हढच आपल्या भारतातील नवीन पिढीला ठाउक आहे. आणि इकडे तर यथासांग झालेलं होळीपूजन आमच्या नातवंडाना पहायला मिळालं. मी स्वतः तसा कर्मकांडी नाही पण ही रिचुअल्स करायची तर ती शुद्ध स्वरूपात करावी असे मात्र मला मनोमन वाटतं. यानंतर या भागात कार्यरत असलेल्या चिन्मय मिशनची आणि विशेषतः ते चालवत असलेल्या बालविहाराची माहिती मिळाली.



**प्रश्नांतून माहिती**

अमेरिकेत वास्तव्य करत असलेल्या भारतीयांच्या मुलांना आपापली मातृभाषा शिकविण्यासाठी तसेच आपला धर्म आणि आपली संस्कृती यांचे संस्कार

करण्यासाठी चिन्मय मिशनने सुरू केलेला हा उपक्रम खरोखरच स्तुत्य वाटतो. मराठी भाषा; संस्कृती आणि अध्यात्मिकता यामध्ये यांमध्ये रस असल्यामुळे दीपा मिशनच्या कार्यात सहभागी झाली. सिद्धीही मराठी शिकायला तिथे जाऊ लागली.

**मराठी शाळा व त्यांचे कार्यक्रम**

अशा या बालविहारच्या छायेत २००९ साली २५ मुलांना घेऊन मराठी शाळेची सुरुवात झाली. शाळेची मूळ संकल्पना वृंदा पित्रे यांची. मुलांचा अभ्यासक्रम कसा असावा, निरनिराळ्या वयोगटातील मुलांना काय आणि कसे शिकवावे त्यांची परीक्षा कशी घ्यावी, सांस्कृतिक कार्यक्रम कसे सादर करावेत या सर्व गोष्टींचं नियोजन आणि मार्गदर्शन आजही त्या उत्साहाने करत असतात. परंतु त्यांच्या या वैचारिक संकल्पना प्रत्यक्षात उतरवण्याचं कार्य केलं ते अंजली देशपांडे यांनी. शाळा सुरू झाल्यापासून मुलांना प्रत्यक्ष शिकवणे, त्यांच्या परीक्षा घेणे, सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करून मुलांना सांस्कृतिक दर्शन घडवणे हे सारं कार्य त्या अत्यंत उत्साहाने आणि निरलसपणे पार पाडत आहेत.



सांस्कृतिक दर्शन

अशा प्रकारच्या आदर्श कार्यांमुळे दोनच वर्षात मुलांची संख्या ८० वर पोहोचली आणि आता तर मराठी शाळा ही अटलांटा महाराष्ट्र मंडळाच्या कार्यांचा एक भाग बनली आहे. आणि चिन्मय मिशन मधील बालविहार मध्ये असणारी शाखा जरी चालू असली तरी मराठी शाळेचं हे रोपटं; वृंदा पित्रे, अंजली देशपांडे, पल्लवी आमडेकर, विजय देशपांडे, शैलेन्द्र पित्रे, सुदर्शन देसाई, तपशाळकर आणि त्यांचे अनेक शिक्षक-सहकारी; या सर्वांनी अत्यंत कळकळीने केलेल्या अथक प्रयत्नांमुळे अन्यय स्वतंत्रपणे जोमाने फुलू लागलं आहे. मुलांच्या अभ्यासक्रमाचे किलबिल, कुमार आणि किशोर असे तीन टप्पे ठरले आहेत कुमार आणि किशोर या वर्गातील मुलं बृहन्महाराष्ट्र मंडळीतर्फे आयोजित होणाऱ्या भारतीय विद्यापीठाच्या परीक्षांनाही बसू लागली आहेत.

भाषा हे वस्तुतः केवळ एक माध्यम आहे. या माध्यमाचा उपयोग करून जाणून घ्यावयाची असते ती संस्कृती आणि चालीरीती. हाच हेतू सतत नजरेसमोर ठेवून मराठी शाळेच्या सर्व कार्यक्रमांची आखणी झालेली दिसते. आल्या आल्या मलाही त्याचा प्रत्यक्ष अनुभव आला, खूप आनंद वाटला, आपण ज्या संस्कृतीत वाढलो त्या संस्कृतीचे संस्कार आपल्या मुलांवरही घडावे म्हणून चाललेल्या त्यांच्या या धडपडीची ही कथा मला जी दिसली ती इतरही अनेकांना कळावी म्हणून हा प्रपंच.

२० ऑक्टोबरला आम्ही अमेरिकेत आलो आणि त्यानंतर तीनच दिवसानी म्हणजे २३ तारखेस मराठी शाळेचा दिवाळी कार्यक्रम असल्याचे आम्हांस समजले. मनात म्हटलं कार्यक्रम काय असणार? छोट्या मुलांचे नाच, गाणी, दिवाळीचं महत्त्व सांगणारं एखादं छोटसं भाषण आणि मग अल्पोहार. . आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे त्यानिमित्ताने होणाऱ्या भेटीगाठी. कनेक्टिकटला अशा प्रकारच्या एक दोन कार्यक्रमांना मी हजेरी लावली होती. गुढीपाडव्याच्या कार्यक्रमाच्या गुढीपाडव्याचं महत्त्व सांगण्यासाठी मीही एकभाषण ठोकलं होतं. त्या

अनुभवांच्या जोरावरच याही कार्यक्रमाच्या स्वरूपाची कल्पना करत करत आम्ही कार्यक्रमस्थळी दाखल झालो.

प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर प्रथम एका छोट्याशा प्रदर्शनानं लक्ष वेधून घेतलं. मुलांनी बनविलेले आकाशकंदील, चांदण्या, शोभेच्या वस्तू आणि लाडू, चिवडा, चकल्या इत्यादी दिवाळीचा फराळ दिवाळी येऊन ठेपल्याची वर्दी देऊन वातावरणनिर्मिती करत होता. ते सारं न्याहाळत असतानाच कार्यक्रम सुरु होत असल्याची सूचना ऐकली आणि आम्ही घाई घाईने स्थानापन्न झालो.

कार्यक्रमाची सुरुवात ''मी मराठी'' या समूहगीताने झाली. निशिकांत कदम, जयेश आमडेकर, विजय देशपांडे, मिलिंद गुप्ते इत्यादी गायकवृंद आपल्या खणखणीत आवाजात आपण मराठी असल्याची ललकारी देत होता तर स्वप्ना कुमठेकर व इतर भगिनी आपल्या मंजुळ आवाजात त्यांना साथ देत होत्या. या गीताबरोबरच महाराष्ट्राचा गेल्या ५०० वर्षांचा इतिहास प्रतीकात्मक पद्धतीने उभा केला गेला. महाराष्ट्र धर्माची पताका प्रथम फडकविणारे महाराष्ट्राचे आद्य दैवत ज्ञानेश्वर हे निवृत्तीनाथ, सोपान आणि मुक्ताबाई या आपल्या भावंडांसह अवतीर्ण झाले. त्यानंतर महाराष्ट्राचं दुसरं दैवत शिवाजी महाराज युवराज संभाजीला घेऊन आले, आणि त्यानंतर ही परंपरा टिळक, आंबेडकर, सावरकर अशी पुढे सरकत आधुनिक काळात जीवनाच्या सर्व क्षेत्रांत पसरली. लता मंगेशकर, सुनील गावसकर, सचिन तेंडुलकर आणि आणि अण्णा हजाऱ्यांपर्यंत महाराष्ट्रातील अनेक कर्तृत्ववान व्यक्तिमत्वांचं दर्शन घडवलं गेलं. गीत झाल्यावर स्वप्ना पुराणिक आणि श्रिया डिस्कळकर यांनी सूत्र हातात घेतली. प्रथम गीता बरोबर येऊन गेलेल्या महनीय व्यक्तींना मुलांनी ओळखलं का ते जाणून घेतलं. ज्यांना मुलांनी ओळखलं नव्हतं त्यांची माहिती सांगितली. त्यानंतर वसुबारस पासून प्रारंभ करून दिवाळीच्या प्रत्येक दिवसाची माहिती मुलांना प्रश्न विचारत काढून घेतली जिथे मुलांचं ज्ञान तोकडे पडले. तिथे पालकांनी मदतीचा हात पुढे केला. एखाद्या भाषणातून हे सारं सांगण्याऐवजी वर्गात शिकवल्याप्रमाणे मुलांना कथनात सामावून घेऊन ही माहिती दिली गेली. त्यामुळे माहिती ग्रहण करताना मुलांचा उत्साह कायम राहिलेला दिसला.

यानंतर महाराष्ट्र मंडळाचे भूतपूर्व अध्यक्ष श्री. वैभव साठे यांनी लक्ष्मीपूजनाची महती मुलांना सांगून तिची पूजा कशी करावी तेही प्रत्यक्ष समजावून सांगितलं. कोणत्याही देवतेची पूजा करताना प्रथम विघ्नहर्त्या गणेशाची पूजा करावी हे त्यांनी आवर्जून सांगितलं बरीचशी मुलं कार्यक्रमाला येताना पूजेचं ताम्हण, लक्ष्मीचं प्रतीक आणि फुलं घेऊन आली होती. अत्यंत भक्तिभावाने पूजा कशी करावी ते या मुलांना शिकून घेताना पाहून संतोष वाटला. श्री. साठे हे मुलुंडचे. कार्यक्रम झाल्यावर त्यांच्याशी परिचय झाला.

श्री. साठे यांनी आपल्या फावल्या वेळात संपूर्ण पूजाविधींचा सखोल अभ्यास केला आहे. गणपती पूजा, सत्यनारायणाची पूजा तर ते सांगतातच. पण वास्तुशांतीची पूजाही ते करू लागले आहे.

यानंतर महाराष्ट्र मंडळाचे आणखी एक भूतपूर्व अध्यक्ष श्री. निशिकांत कदम यांनी आपल्या खुमासदार शैलीत आपल्या लहानपणी दिवाळी कशी साजरी होत होती ते मुलांना सांगितलं. नवरात्र झाली की बहुधा शाळांना सुट्टी पडायची आणि मग पहिली धावपळ सुरु व्हायची ती आकाशकंदील बनवायची. कोठून तरी बांबू आणा, तासून त्याच्या काठ्या करायच्या आणि मग त्यांचा सांगाडा तयार झाला की त्याला रंगीत कागद चिकटवायचे, शेपट्या लावायच्या, कागदाच्या करंज्या आणि फुलं करून लावायची. एकीकडे घरात बसलं की हे काम चालायच तर दुसरीकडे किल्ले बनवायचे कामही जोमाने चालायचं

कदम साहेबांनी हे किल्ले बनविताना झालेल्या खूप गमती जमती सांगितल्या. किल्ल्यावर मावळे असायचे आणि काही चिनीही ठेवले जायचे. काळ शिवाजीचा पण डोंगराला बोगदा करून त्यातून आगगाड्याही जाताना दाखविल्या जायच्या आणि एकदा डोंगराची दरड कोसळली तेव्हापासून गाड्या सोडायचं बंद केलं असं जेव्हा ते म्हणाले तेव्हा सगळ्यांना कोकण रेल्वेची आठवण आली श्री. कदम यांच्या या कथनात सारी मुलं तर रंगून गेली होती पण माझ्यासारख्या ज्येष्ठांच्याही डोळ्यासमोर तो काळ उभा राहिला. दिवाळीच्या दिवसात तेव्हा मुंबईतही खूप थंडी असायची आणि तरीही पहाटे उठायचा केवढा उत्साह असायचा. तेव्हा घरात गीझर नव्हते कोळसे आणि लाकडं घालून बंब पेटवला जाई. आता बंब म्हणजे काय ते म्युझियम मध्ये ठेवला असेल तर दाखवता येईल. पाणी गरम झालं की तांब्याच्या घंगाळात काढून घ्यायचं तशी घंगाळ आता क्वचित शोभेची वस्तू म्हणून पाहायला मिळतात आणि मग उटणं लावून आंघोळ करायची. नवे कपडे घालायचे आणि देवदर्शनाला जायचं दिवाळीच्या फराळाच तेंव्हा कोण कौतुक वाटायचं कारण ते सारे पदार्थ फक्त दिवाळीलाच यांची लज्जत काही और होती. ज्यांनी ती चाखली त्यांना ती विसरता येणार नाही आणि त्या मजेच शब्दात वर्णनही करता येणार नाही. असो.

यानंतर अंजली देशपांडे यांनी मराठी शाळेच्या कार्याचा, प्रगतीचा आढावा घेतला, सर्व कार्यकर्त्यांचे आभार मानले, महाराष्ट्र मंडाळाने दिलेल्या सक्रिय मदतीबद्दल त्यांनाही धन्यवाद दिले. सर्व उपस्थितांना लाडू चिवड्याचा फराळ दिला आणि त्यानंतर कार्यक्रम समाप्त झाला.

कार्यक्रम संपता संपता माझ्या मनात विचारचक्र सुरु झालं होतं मी जे काही कल्पिलं होतं त्यापेक्षा काही वेगळा अनुभव आला होता का? मराठी शाळा ही मुळात आपल्या मराठी मुलांच्या मुलांना मराठी लिहिता वाचता यावं म्हणून सुरु झाली आहे. पण हे का शिकायचं त्याचा मुख्य उद्देश महत्त्वाचा आहे. आपल्या आजी आजोबांशी गुजगोष्टी करता याव्यात, महाराष्ट्राच्या इतिहासाची, संस्कृतीची ओळख व्हावी, महाराष्ट्रात होऊन गेलेल्या आणि आजही कार्यरत असलेल्या थोर व्यक्तींच्या कार्याची जाणीव सण, उत्सव, परंपरा हे सारं समजून उमजून जतन केलं जावं हे सारे उद्देश. आयोजकांनी हे कार्यक्रम सादर करताना केवळ करमणूकप्रधान कार्यक्रम करण्याऐवजी वरील सारी उद्दिष्टं नजरेसमोर ठेवून त्यांनाच प्राधान्य दिलं हे मला कौतुकास्पद वाटलं, आयोजकांना धन्यवाद देण्याची उर्मी उफाळून आली आणि मग कसलाही विचार न करता सरळ व्यासपीठावर गेलो अंजली देशपांडे यांच्याकडे दोन शब्द बोलण्याची इच्छा व्यक्त केली. त्यांनीही चटकन माइक हातात दिला आणि मग मनात आलेल्या सर्व भावना व्यक्त करून मी त्यांना धन्यवाद दिले.

भारतात आमच्या पिढीवर जे संस्कार झाले, आमच्या मुलांवर जसे झाले तसेच संस्कार आमच्या या नातवंडांवर या परक्या देशात, परक्या वातावरणात होताना पाहून मी सुखावलो होतो. पण सुखावलेपणाचा तो भर ओसरल्यावर पुन्हा एकदा काहीसा विचारमग्न झालो. भाषा शिकायची ती आपली संस्कृती जाणून घेण्यासाठी आणि संस्कृती जाणून घ्यावयाची ती आपले सण, उत्सव, परंपरा यांच्या माध्यमातून. पण पुढे काय? त्या संस्कृतीचे उद्दिष्ट काय? किंबहुना संस्कृती म्हणजे तरी काय? आणि वर्षानुवर्षे नुसते सण आणि उत्सव साजरे करून ते मुख्य उद्दिष्ट साध्य होईल का? व्यष्टीपासून समष्टीपर्यंत जाणे, प्रथम स्वतःची उन्नती करून आपले कुटुंब, समाज यांचा सर्वांगीण म्हणजे भौतिक, मानसिक आणि अध्यात्मिक विकास घडवून आणण्यासाठी हातभार लावणे. हे संस्कृतीचे महत्त्वाचे उद्दिष्ट. धर्म, अर्थ, काम, आणि मोक्ष असे चार पुरुषार्थ मानणाऱ्या आपल्या संस्कृतीने अर्थ आणि काम नाकारलेलं

---

स्वतःखोटं वागत असल्याचं जेव्हा एखाद्याला पटतं, तेव्हा तो स्वतःशी सर्वात जास्त प्रामाणिक असतो. - मार्क ट्वेन

नाही. मात्र त्यांना धर्माचं अधिष्ठान असावं असं सूचित केलं आहे आणि मोक्ष हे ध्येय समोर ठेवलं आहे. कुटुंब आणि समाज यांचा विकास साधल्यावर संपूर्ण राष्ट्राचा विकास आणि तोही करताना आपण संपूर्ण मानवतेचे एक घटक आहोत याची जाणीव ठेवून. वैदिक काळापासून आमच्या संस्कृतीने निर्माण केलेला हा आदर्श. कार्यक्रम संपला होता. थोड्याशा ओळखीदेखी झाल्या नमस्कार चमत्कार झाले आणि नंतर आम्ही घरी गेलो.

**सामूहिक दिवाळी :**

त्यानंतर दिवाळीचा आठवडा तर खूप मजेत गेला. गीतेश कनेक्टिकटमध्ये असताना एका दिवाळीला आम्ही तिथे होतो. पण तिथे शेजारचे एक फडके सोडले तर आजूबाजूस सारी गोऱ्यांची वस्ती. त्यामुळे दिवाळीच वातावरण काही जाणवलं नाही इकडे गीतेश ज्या गृहसमूहामध्ये राहतो तिथे जवळ जवळ २५/२६ घरं भारतीयांची आहेत. सर्वांनी आपल्या घरावर दिव्यांची रोषणाई केली होती आकाशकंदील लावले होते, रांगोळ्याही काढल्या होत्या त्यामुळे दिवाळीचं वातावरण अमेरिकेत असूनही खूप छान अनुभवता आलं.

**महाराष्ट्र मंडळ आणि त्यांचे कार्य :**

हां हां म्हणता ऑक्टोबर महिना संपला. नोव्हेंबरच्या ५ तारखेस महाराष्ट्र मंडळाचा दिवाळी कार्यक्रम होता. एका नाचात आमच्या सिद्धीचाही सहभाग होता. माझ्या मनात उठलेल्या विचारचक्राला इथं प्रतिसाद मिळणार आहे, याची पुसटशीही कल्पना नव्हती पण हॉलमध्ये शिरतानाच 'गुजगोष्टी' ही स्मरणिका हातात आली. कार्यक्रम सुरु होण्यास थोडा वेळ होता म्हणून चाळू लागलो.

उपाध्यक्ष श्री. चन्दन गोखले यांचं मनोगत मराठीत लिहिलेलं दिसलं म्हणून नजर टाकली. गोखले म्हणतात "आपलं मंडळ कशासाठी आहे? आपण फक्त सांस्कृतिक कार्यक्रम करायचे का? मराठी संस्कृती गुढी उभारणे, गणेश उत्सव साजरा करणे, लावणी आणि नाट्यसंगीताचे कार्यक्रम करणे ह्याच्यापेक्षा खूप प्रगल्भ आहे.

ती प्रगल्भता इथे अमेरिकेत कशी जोपासायची? 'संपर्कातून प्रगतीकडे' हे ब्रीदवाक्य आणि त्यानुसार आयोजित केलेले कार्यक्रम हे ह्या प्रश्नांची उत्तरं शोधण्याचा एक प्रयत्न आहे.

गोखल्यांच्या विचारांची दिशा मला सुखावून गेली. खरे म्हणजे हे सण उत्सव प्रतीकात्मक आहेत. गुढी उभारली जाते ती विजयोत्सव साजरा करण्यासाठी, दिवाळीत आपण दिवे लावतो ते प्रकाशाची, ज्ञानाची पूजा करण्यासाठी, महती गाण्यासाठी, उत्सवाच्या निमित्तानं समाज एकत्र येतो, एकदिलानं कार्य करतो, एकत्र बांधला जातो. पण गोखले म्हणतात त्याप्रमाणे या संपर्कातून प्रगतीकडे जाण, सर्वांचा उत्कर्ष साधण हे उद्दिष्ट असायला हवं. स्मरणिका चाळताना मला समजलं की हे मंडळ नुसता विचार मांडून स्वस्थ बसलेलं नाही तर त्यांनी 'एकल विद्यालयाच्या माध्यमातून महाराष्ट्रातील काही शाळांना सहाय्यही केलं आहे, गरजू विद्यार्थ्यांसाठी मदतीचा हातही पुढे केला आहे. त्याविशी सादर झालेल्या सर्व कार्यक्रमांतून भारतातील निरनिराळ्या प्रांतातील संस्कृतीचं दर्शन घडवण्यात आलं. म्हणजे व्यष्टीतून समष्टीकडे जात असताना इतर अमराठी बांधवांशी जोडून घेण्यासाठी पावलं टाकली जात होती, राष्ट्रभावनाही जपली जात होती. आणि एव्हढेच नव्हे तर आपण ज्या देशात राहतो त्या देशातील विविध लोकोपयोगी उपक्रमांतही भाग घेतला जात होता. आफ्रिकेतील ग्रंथालयांना पुस्तकांची भेट देऊन आंतरराष्ट्रीय स्तरावरही या मंडळानं आपला ठसा उमटविला आहे.

अटलांटातील दिवाळी अशा तऱ्हेने अनुभवली. मराठी शाळा आणि महाराष्ट्र मंडळ यांचे कार्यक्रम तर पाहिलेच परंतु त्यांच्या प्रत्यक्ष कार्याची, कार्यपद्धतीची

शाळा - कॉलेजमध्ये केलेली पोपटपंची विसरुन गेल्यावर जे शिल्लक उरते, त्याला शिक्षण म्हणावे. - जॉर्ज बर्नार्ड शॉ

ओळख करून घेतली. ''तमसो मा ज्योतिर्गमय'' या आर्योक्तीला अनुसरून अंध:कारातून प्रकाशाकडे, ज्ञानाकडे झेप घेतलेल्या या मराठी बांधवांनी स्वत:चा उत्कर्ष साधून इतरांचाही उत्कर्ष साधण्यासाठी, आपल्या संस्कृतीही जपणूक करण्यासाठी चालवलेली धडपड पाहून धन्यता वाटली. आणि आपलं कुटुंबही आता या समूहाचा एक भाग आहे म्हणून आनंदाबरोबर अभिमानही वाटला.

शेवटी जाता जाता मनात आलेला एक विचार मांडावासा वाटतो. ''ह्युमन सायकल'' या ग्रंथामध्ये योगी अरविंद म्हणतात की मानवाची उक्रांती ५ टप्प्यांनी झाली आहे. 1) Symbolic Age 2) Typal Age 3) Conventional Age 4) Individualistic Age 5) Subjective Age. आजचा बहुसंख्य समाज हा तिसऱ्या व चौथ्या टप्प्यांवर आहे. मात्र कांही तुरळक व्यक्ती ५ व्या टप्प्यावर पोहोचल्या आहेत. व्यक्तीगत जीवनात भौतिक प्रगती साधल्यावर माणूस सांस्कृतिक प्रगती साधून मनाच्या वरच्या स्तरावर जाऊ लागतो. आणि त्यानंतर त्याला वेध लागतात ते आत्मोन्नतीचे. या आत्मोन्नतीचे तंत्र आणि मंत्र भारताच्या पारंपारिक ज्ञानांत साठवलेले आहे आणि आज जरी त्या ज्ञानापासून आपण दूर गेलो असलो तरी भारतीयांना पारंपरिक संस्कारांमुळे ते सहज साध्य आहे. आणि म्हणूनच १०० वर्षांपूर्वी जेव्हा परकीय जोखडातून मुक्त होण्यासाठी आपल्या स्वातंत्र्यलढ्यास सुरुवात झाली, तेव्हा उत्तरपारा येथे केलेल्या भाषणांत श्री. अरविंद म्हणाले होते – ''इतर राष्ट्रांप्रमाणे केवळ स्वत:च्या भरभराटीकरता अथवा स्वत: सामर्थ्यवान होऊन दुर्बलांना चिरडण्यासाठी भारताचा उदय होत नाही आहे तर जे शाश्वत ज्ञान त्याजपाशी आहे ते साऱ्या जगाला देण्यासाठी त्याचा उदय होतो आहे. प्राचीन काळापासून या देशांत जसा सप्तनद्यांचा प्रवाह वाहतो आहे तसाच आध्यात्मिक ज्ञानाचा स्त्रोतही वाहतो आहे. आणि म्हणून आध्यात्मिक ज्ञानाचा प्रकाश साऱ्या मानवजातीस दाखवणं हे भारताचं ईश्वरदत्त कार्य आहे''

प्रगतीच्या ३ ऱ्या व ४ थ्या टप्प्यावरुन Subjective Age कडे झेपावणाऱ्या मानवी समाजाला पुढील प्रगतीची दिशा आणि मार्ग दाखवण्याचं कार्य भारतास आणि भारतीयांना कराव लागणार आहे. आणि म्हणून ''संपर्कातून प्रगती'' हे तत्त्व साकारताना त्या प्रगतीचे अंतिम ध्येय काय ते ध्यानात ठेवून आपणास आपली Integral Development साधावी लागेल.

श्री. नरेन्द्र नाडकर्णी
सीडी. १०१, सी. १,
श्रीरंग सोसायटी, ठाणे.
दूरध्वनी – २५३३३१६०
E mail : nd_nadkarni@yahoo.com

●●●

प्राचीन चीनी मतानुसार वास्तुतज्ज्ञ हौउ वी याने पाश्चात्य देवतेसाठी हिरव्या मौल्यवान खड्याचा महाल बांधला. त्या मोबदल्यात देवतेने त्याला अमर होण्याची एक गोळी दिली. पण तिने घातलेल्या अटीनुसार तो त्या जादूच्या गोळीचा उपयोग काही गोष्टींची पूर्तता केल्यानंतर करु शकणार होता. हौउवीची पत्नी चेंजर हिला देवतेने घातलेल्या अटींची माहिती नसतानाही तिने ती गोळी अपघाताने गिळली. समावलेल्या देवतेने तिचे चंद्रात रूपांतर केले. आता ती ऑगस्ट महिन्यातील पौर्णिमेला, जी वर्षातील सर्वांत उज्वल पौर्णिमा असते, त्या रात्री दिसते.

– संग्रहातून


# स्वामी रामतीर्थ

(लेखांक पाचवा)

*स्वामींची अमेरिकेतील यात्रा व देह गंगार्पण केला या घटनेच्या काळांतील वर्णन या लेखात आहे. - संपादक*

**स्वामीजी अमेरिकेत :**

सॅन फ्रान्सिस्कोचा किनारा जवळ आला. उतारूंची गडबड सुरू झाली. स्वामीजी डेकवर निश्चिंत मनाने लोकांची धावपळ पाहात होते. इतक्यात एक अमेरिकन गृहस्थ स्वामीजींजवळ आला. आणि म्हणाला आपण अद्याप स्वस्थ कसे. आपले सामान कुठे आहे. स्वामीजी म्हणाले - अंगावरील कपड्याखेरीज माझे सामान नाही. आपणाजवळ पैसे वगैरे, या प्रश्नाला स्वामीजी म्हणाले मी पैसे कधीच बाळगत नाही. मग आपले चालते कसे? स्वामीजी म्हणाले सर्व प्राणिमात्रावर प्रेम करून मी जगतो. लोटाभर पाणी मला सहज मिळते भूक लागते त्यावेळी कोणीही अन्न देते. अमेरिकेत आपला कोणी मित्र आहे का? यावर स्वामीजी म्हणाले केवळ एकच अमेरिकन माझ्या माहितीतले आहेत. कोण ते मित्र? स्वामीजी त्याच्याकडे पाहात म्हणाले- हा तो माझा मित्र. त्या गृहस्थाच्या खांद्यावर हात ठेवून स्वामीजी म्हणाले. त्यांचा स्पर्श होताच गृहस्थाचे अंग थरथरले. त्याला एकदम वाटू लागले स्वामीजींची व आपली फार दिवसापासूनची मैत्री आहे. मग ते गृहस्थ स्वामीना म्हणाले अमेरिकेत आहात तितके दिवस तुम्ही माझे पाहुणे म्हणून माझ्या घरी राहावे. स्वामीजींना आपल्या बरोबर घेऊन ते घरी आले. स्वामीजी अमेरिकेच्या वास्तव्यात याच श्री हिलर यांच्याकडे बराच काळ राहिले. स्वामीजींच्या सहवासाने श्री हिलर प्रभावित झाले.



ते स्वामीजींकडे पाहून म्हणायचे, भारतीय ऋषिमुनी यांचे प्रत्यक्ष दर्शन मी घेत आहे. स्वामीजी म्हणजे ज्ञानसूर्य. त्यांना स्वार्थ, प्रसिद्धी माहीत नाही. केवळ त्यांच्या दर्शनाने माझे संपूर्ण समाधान झाले.

वृत्तपत्रातून रामतीर्थांबद्दल माहिती झळकल्यामुळे अनेक लोक त्यांना भेटावयास आले. स्वामीजींच्या दर्शनाने त्याना आनंद होई व बोलण्याने समाधान होई. त्यांच्या अनेक प्रश्नांना स्वामीजी समर्पक उत्तरे देत असत. एक अमेरिकन नटी भेटीसाठी आली. त्यांना मी माझ्या सौंदर्याने त्यांचे चित्त विचलित करेन असा तिने निश्चय केला होता. तिने स्वामीजीना एकांतात भेटण्याची इच्छा व्यक्त केली. तिच्या इच्छेप्रमाणे स्वामीजी एकटेच असताना ती त्यांच्या समोर गेली. स्वामीजींवर भुरळ पडेल या शब्दांत बोलू लागली तेव्हा स्वामीजीनी एकटक तिच्या कडे पाहिले त्यांची दृष्टादृष्ट होताच तिच्या विकृत भावना एकदम नाहीशा


झाल्या. ती ओशाळली. व स्वामीजींना तिने आदराने प्रणाम केला.

स्वामीजींना निसर्गाच्या सान्निध्यात राहणे अतिशय आवडे. त्यामुळे ते शस्तास्प्रिंग येथे राहू लागले. हे वनस्थळ गिरिकुशीला वसले होते. उंच झाडांनी व वाहणाऱ्या सेकोमेन्टो नदीने तो प्रदेश आल्हाददायक बनविला होता. त्या ठिकाणी एका शिलाखंडावर बसून पक्ष्यांचे गाणे ऐकत, निवान्तपणे चिन्तन करीत बसत असत. ही जागा त्यांना अतिशय आवडली. तेथे ते वृत्तपत्रे व अन्य पुस्तके वाचीत व आलेल्या लोकांशी चर्चा करीत.

शास्तास्प्रिंगला स्वामीजींकडे लोक येत असत. एंजली येथील श्रीमती वेलमन आणि कॅलिफोनिया एथील पॉलिमव्हिटमन -लघु लेखिका (steno) होती. या दोघीही विदुषी होत्या आध्यात्म शिकण्यात दोघीही आतुर होत्या. स्वामीजी काही बोलताच ती चटकन टिपून घेई. मग टंक-लिखित करून वृत्तपत्राकडे पाठवी तिच्यामुळे स्वामीजींचे बरेचसे लिखाण व व्याख्याने जगाला उपलब्ध झाली लखनौला रामतीर्थ पाब्लिकेशन यांनी व्याख्यानांचे आठ खंड प्रसिद्ध केले.

**अमेरिकन विश्वविद्यालय व्याख्याने :**

त्यांनी अमेरिकेत अनेक विश्वविद्यालयांना भेटी दिल्या व विविध विषयांवर व्याख्याने दिली. भारतीय तत्वज्ञान, भारतीय संस्कृती, यावरील व्याख्याने झाली. ही व्याख्याने पॉलिन व्हिटमन हिने लिहून घेतली. त्यांची विषय मांडण्याची पद्धत गणिताच्या माध्यमातून असे. जानेवारी १९०३ मधे सॅन् फ्रान्सिको येथील एका व्याख्यानात माया तिचे स्वरुप आणि कार्य या विषयावर व्याख्यान झाले. त्यावेळी ते म्हणाले घटक वस्तूंच्या स्वाभाविक धर्माहून निराळे भासमान होणारे धर्म हे नूतन आहे. या पेक्षा याला आधिक महत्व नाही. या अवस्थेला माया म्हणतात.



आ. २ आ. १ आ. ३ आ. ४

आकृती २ व ३ दोन समभुज त्रिकोण आकृती १ समांतरभुज चौकोन आकृती २ व ३ मधील त्रिकोणाची लांबी सारखी आहे ती ३ व ५ या तीनही आकृती कागद कापून समांतर भुज चौकोनाला चिकटविल्या तर ती आकृती ४ प्रमाणे षट्कोन होईल. सर्वात मोठी भुजा ५ आकड्याने दाखविली आहे. पण षट्कोनात त्याचा मागमूसही राहात नाही. मूळ स्वरुप ज्या योगे घटते तिला माया म्हणतात.

एकदा एक धनिक आले. त्यांच्याकडे भरपूर संपत्ती असूनही त्यांना समाधान वाटत नव्हते. स्वामीजींनी त्यांना एक गोष्ट सांगितली. दोन गृहस्थ होते एक धनिक दुसरा कंगाल. धनिकाकडे शेतकऱ्याने चांगले बियाणे आणून ठेविले व पैसे उसने घेऊन गेला. तो कंगालही या धनिकाकडे आला. त्याच्या जवळ काही विकत धान्य मागितले. त्या बियाणातील एकशेरभर धान्य त्याने दिले व सांगितले मला याचे पैसे देऊ नकोस परत सव्वाशेर धान्यच आणून दे. कंगाल घरी आला पुरचुंडी सोडली. ते उत्तम बियाण आहे हे कळले. त्याने पोटाला चिमटा घेऊन ते आपल्या शेतात पेरले. त्याचे खंडीभर धान्य झाले. त्याने धान्य परत केले. व आणखी अधिक सव्वाशेर कोणी याचक आल्यास देण्याबद्दल सांगून दिले. धनिकाला आश्चर्य वाटले. माझ्याकडे पोतेभर बियाणे होते ते शेतात पेरले असते तर खंडीगणती धान्य मिळाले असते. स्वामीजी म्हणाले, तू तुझा पैसा चांगल्या कामासाठी खर्च केला नाहीस. तुझी मुले व्यसनाधीनतेत पैसा उडवून टाकतील व दरिद्री होतील. पैसा बंदिस्त केल्यामुळे तुला शांती नाही तो दान करून कमी होईल, तसे तुला शान्ति लाभेल. स्वामीजींना नमस्कार

करुन तो गृहस्थ गेला. आपला पैसा विद्यादानात खर्च करण्याचे ठरविले.

अमेरिकेत सतत, वाचन, चिंतन, चर्चा, व्याख्याने, मुलाखती यांनी संपूर्ण वेळ जात असे. अनेक अमेरिकन लोक त्यांचे शिष्य बनले. व्याख्यानाने अमेरिकन लोकांची मने जिंकली. भारतात आध्यात्मिक ज्ञानाचा अनंत ठेवा आहे. त्यात कितीही उपसल तरी कमी होत नाही. दोन व्यक्तींची गाठ पडताच ते ॐ उच्चाराने हस्तांदोलन करू लागले.

सेंटलुई येथे जागतिक एक परिषद जुलै महिन्यात भरणार होती. यासाठी स्वामीजींना आग्रहाचे निमंत्रण होते. त्या परिषदेत बऱ्याच लोकांनी भाषणे केली लोक कंटाळले. परिषदेच्या अध्यक्षांनी सांगितले शेवटून स्वामीजी बोलणार आहेत. लोक पुन:जाग्यावर बसले. या प्रमाणे दोन वर्षे अमेरिकेत राहून प्रिन्सेस आयटन या बोटीनं २२ आक्टोबर १९०४ रोजी अमेरिकन जनतेचा निरोप घेऊन निघाले. स्वामीजींचा विरह अमेरिकन लोकांना फार जाणवला.

**स्वामीजी भारतात परतले :**

स्वामीजीची बोट जिब्राल्टर, माल्टा या मार्गाने जाणार होती. स्वामीजीना आनंद झाला. ते कैरोला आले. तिथे एका मशीदीत पर्शिअन मधून तत्त्वज्ञानावर त्यांचे व्याख्यान झाले. बोस्तान व गुलिस्तान या मान्यवर वक्त्यांच्या उच्चाराने तेथील लोक प्रभावित झाले. ईश प्रेरित साधू म्हणून त्यांचा गौरव करणत आला. मग ते पोर्टसय्यदला आले. तेथेही त्यांचे व्याख्यान उर्दुमधून झाले. ते ज्या बोटीने भारताला निघणार होते त्याच बोटीने व्हाइस रॉय लॉर्ड कर्झन भारताच्या प्रवासाला निघणार होते. स्वामीजीनी ती बोट नाकारली. त्याच्या नंतरच्या बोटीने स्वामीजी निघाले. ८ डिसेंबर १९०४ या दिवशी दुपारी स्वामीजी मुंबईला आले. शिवगणाचार्य व त्यांचे शिष्य आणि स्वामीजींचे चाहते या सर्वांनी त्यांचे स्वागत केले.

स्वामीजींचा मुक्काम मुंबईत पाच दिवस होता. या अवधीत त्यांची तीन व्याख्याने झाली. मग ते शिवगणाचार्यांच्या आग्रहावरुन मथुरेला आले. शिवगणाचार्य संन्यासी होते पण त्यांचा संन्यास वेगळ्या प्रकारचा होता. वेदान्त प्रचारासाठी संस्था स्थापन करण्यात राजे, राजवाडे, धनिक यांच्याकडून धन जमा करावे. पुस्तके छापावीत लोकाना खऱ्या वेदान्ताची दीक्षा द्यावी अनेक शिष्य असावेत, समृद्ध जीवन असावे अशा विचारांचे गणाचार्य होते. मथुरेला स्वामीजीजवळ आपला विचार बोलूनही दाखविला. स्वामीजीना हा विचार आवडला नाही. हा संन्यास धर्माचा अपमान आहे. मथुरेत काही ख्रिश्चन तरुण स्वामीजींच्या भेटीसाठी आले. तो दिवस २५ डिसेंबरचा होता. त्या दिवसाच्या स्वामीजीनी युवकांना शुभेच्छा दिल्या. तरुणांना बरे वाटले. मथुरेत असे पर्यंत सायंकाळी स्वामीजी यमुनेच्या वाळवंटावर जाऊन बसत. एकान्तांच्या अभावी स्वामीजी कंटाळले.

गणित हा विषय स्वामीजींचा अत्यंत आवडीचा. हा विषय त्यानी स्वत: पुरता ठेवला नाही. गणितातील मूलभूत सिद्धांताचा आत्मज्ञानातील महान तत्त्वाचा कसा जवळच्या संबंध आहे याचे विवेचन त्यानी अनेक व्याख्यानांतून केले आहे. त्यांच्या संपूर्ण जीवनावर गणिताचा प्रभाव होता.

एके दिवशी कुणाला न सांगताच पायी प्रवास करीत पुष्करला किसनगड राजभवनात त्यानी मुक्काम केला. सकाळ संध्याकाळ डोंगराच्या गर्दीत हिंडायचे. जंगलात फिरताना मोठ्याने ॐ चा उच्चार करुन त्याचा प्रतिध्वनी ऐकावा, भगवत् चिंतनात काळ घालवावा असा दिनक्रम होता. सरोवरात अनेक मगरी होत्या. स्वामीजीना त्यांची भीती नव्हती. स्नानापूर्वी दंड पाण्यावर आपटीत. त्या आवाजाने मगरी दूर जात. स्वामीजी शांतपणे स्नान करीत. एकदा सकाळी एक मगर धावत आली व एकदम थांबली. स्वामीजी म्हणाले माझ्या हातात दंडा असल्याने तुला भेटता

येणार नाही. स्वामीजींनी दंडा दूर फेकून दिला व म्हणाले आता तू भेटायला ये. असे बोलताच तोच मगर मागे वळून निघून गेली.

पुष्करला असताना पंजाबचे एक साहित्यिक श्रीगोपाळ सिंह स्वामीजींना वारंवार भेटण्यास येत. त्यांच्या भेटीने मन प्रसन्न होई व कविता स्फुरे. एकदा त्यांनी एका काव्याबद्दल जरा वाईट उद्गार काढले स्वामीजी म्हणाले दुसऱ्याचे चांगले म्हणण्यात आपले काय नुकसान? शिवाय त्यांच्यापाठी निंदा चांगली नाही. निंदा समोर करावी अन्यथा नेहमी स्तुतीच करावी पाठीमागून निंदा चांगली नाही. याचा परिणाम त्या गृहस्थावर झाला ते ॐ म्हणत व मन मोकळी चर्चा करीत ॐ कारानी महान शक्ती मिळते असे स्वामीजी म्हणावयाचे. या एकाक्षरी मंत्राने प्रत्येकाला कल्याण साधता येते.

**पुन: हिमालय :**

मग काही दिवसानी तेथून बद्रीनाथला जाण्याचे ठरविले. वाटेत त्याना व्यासाश्रम लागला. तेथे स्वामीजी बराच काळ राहिले. तिथे वेदान्ताचा अभ्यास केला, ब्रह्मसूत्रे व उपनिषदे यांचा समावेश होता. बऱ्याच दिवसानी पूरणसिंग त्याना भेटला. त्याच्या भेटीनंतर स्वामीजींनी बद्रीनाथ सोडले व ते हरिद्वारला आले. ते आजारी झाले पूरणसिंगाच्या सेवेने लगेच बरे वाटले. अशक्तता बरीच जाणवू लागली. संपूर्ण विश्रांती घेण्याचे स्वामीजींनी ठरविले. त्यावेळी स्वामीजी अमेरिकेहून आल्याचे त्यांच्या सावत्र आईला व पत्नीला कळले. त्यांना भेटण्यासाठी त्या दोघी स्वामीजींचा धाकटा मुलगा ब्रह्मानंद याला घेऊन स्वामीजीकडे आल्या. त्यांना पाहून पत्नी आवाक् झाली. सावत्र आईने त्यांच्याशी खूप गप्पा मारल्या. ब्रह्मानंदाने एक कविता म्हणून दाखविली. स्वामीजीने शाबासकी दिली व एक फळ दिले. पुत्राने आवडीने ते फळ खाल्ले. पत्नीमात्र एक शब्दही बोलली नाही. स्वामीजींच्याकडे गंभीरपणे पाहात होती. अखेर ही भेट संपली. अतिशय जड पावलाने त्यानी स्वामीजींचा निरोप घेतला.

**पूर्वीचे कार्यक्रम सुरू :**

स्वामीजीनी नारायण स्वामीना बोलावून घेतले. पंधरा दिवस इथे मुक्काम होता. स्वामीजीना विश्रांती चांगली मिळाली. पुन:पूर्वीचे कार्यक्रम सुरु झाले. श्रीमत् शंकराचार्यांच्या ग्रंथांच्या अभ्यासाने दर्शन झाले. स्वामीजी म्हणाले जगाच्या पाठीवर आचार्याएवढा मोठा विद्वान अजून निर्माण व्यावयाचा आहे. येथून काही दिवसानी मथुरेला आले. बराच दिवस वास्तव्य केले. इथे मातृभूप्रेम प्रकर्षाने प्रतीत झाले. यामुळे स्वामीजी राजकारणी असल्याचे सरकारला वाटले. गुप्तचर त्यांच्या मागे लागले. टेहरीच्या मुक्कामात दोन गृहस्थ स्वामीजींच्या दर्शनाला आले. ते आत येताच स्वामीजीनी सहर्ष त्यांचे स्वागत केले. नारायण स्वामी म्हणाले यांना स्वामीजींचे काही लिखाण पाहावयाचे आहे. त्यांना सर्व काही दाखवा. हे मोठे सत्पुरुष आहेत. त्यांच्या दर्शनाने धन्यता मिळते. या बोलण्याने पाहुणे आले तसे निघून गेले. ते काही न पाहता निघाल्यामुळे नारायण स्वामींना आश्चर्य वाटले. स्वामीजी त्यांना म्हणाले हे दोघे गुप्तचर होते. त्यांची सक्तनजर असते. रामाकडे मातृप्रेमाखेरीज अन्य काही आढळले नाही आपल्या आईवर प्रेम करण्याचा सर्वांनाच अधिकार आहे. सरकारची खात्री झाली स्वामीजी विरागी साधू आहेत. सरकारी नजर काढून घेतली.

**टेहरीला मुक्काम :**

टेहरीचे राजे साहेब यांच्याकडे पाहुणे म्हणून राहू लागले. पुन: लोकांची ये जा चालू झाली. स्वामीजींनी नारायण स्वामींना एकांताची जागा पाहण्यास सांगितले तिथे एक झोपडी तयार केली स्वामीजी झोपडीत राहू लागले. एक दिवस राजेसाहेब दर्शनाला आले स्वामीजींशी खूप चर्चा केली. त्यांच्या खाण्यापिण्याची सोय होण्यासाठी

भोलादत्त नावाच्या एका विश्वासू माणसाची नेमणूक केली. स्वामीजींना लागणारा शिधा फळे, महाराज पाठवीत. प्रत्येक आठवड्यात येऊन स्वामीजींवर निरतिशय प्रेम होते. झोपडीजवळच्या गुहेत श्वापदे होती. रात्री ती हिंडत भोलाला भीती वाटे. कित्येकवेळी स्वामीजी म्हणत बिलकूल घाबरण्याचे कारण नाही. त्यांच्यावर प्रेम केल्यास ती आपल्याला काही त्रास देत नाहीत.

काही डोंगरी लोक शिकारीसाठी हिंडत. भगव्या वेषाबद्दल त्याना आदर वाटे. कित्येकवेळी ही मंडळी स्वामीजींना भेटत असत.फळे आणून देत. इथेही त्याना अनेक ठिकाणची बोलावणी येत. प्रकृति अस्वास्थामुळे ते कुठेही जात नसत. म्हणून लोकच त्यांच्या दर्शनाला येत.

**सहकाऱ्यांना झोपडी बांधण्यास सांगितले :**

काही दिवसानी पूरण सिंग स्वामीजींकडे आले. स्वामीजींनी त्याला एक झोपडी बांधून राहावयास सांगितले. ईश्वर चिंतनात वेळ घालव ४/८ दिवसानी आपण भेटत जाऊ. एकदा पूरण आले स्वामीजी बाहेर पडत होते. दोघेही गंगेच्या काठी बसून गप्पा केल्या. स्वामी म्हणाले संसाराचा अनुभव घेवून तू या मार्गात पदार्पण केलेस हे फार चांगले झाले संसाराची अतृप्ती तुला आता मागे वळवणार नाही. तू आता शांतपणे ईश चिंतन कर पुढे म्हणाले तुम्ही जवळ आहात आता आठवण होणार नाही. ही भगवी वस्त्रे मुक्ती मागत आहेत. ही पण फेकून देईन, रामला वस्त्राचा सुद्धा अडथळा वाटू लागला.

स्वामींचे हे बोलणे ऐकून पूरण अस्वस्थ झाले. बराच वेळ बसले होते. त्यांचा निरोप घेऊन पूरणसिंग झोपडीत परतले. नारायण स्वामी यांनाही स्वामीजींना भेटण्याची ओढ होती. त्यांनाही एक झोपडी बांधून राहावयास सांगितले. फिरताना स्वामींना एक गुहा आढळली बायरोगी गुहा असे त्याला म्हणत. ती स्वामींना पसंत पडली. स्वामींनी नारायण स्वामींना तिथे राहून आराधना करण्यास सांगितले. नारायण स्वामींना आनंद झाला. स्वामीजींचे नित्य दर्शन होईल काही शब्द कानी पडतील व अंत:करणातला अंध:कार दूर होईल.

नारायण स्वामी रामतीर्थांना भेटावयास आले. स्वामीजी म्हणाले तू आता जा मी गंगेची कूस सोडणार नाही. रामचे लिखाण थांबले. राम काही चर्चा आदि करू शकणार नाही. रामला बोलावणे आल्यास प्रतिनिधित्व तू कर. तू सर्व ठिकाणी जा. आता गुहेत जा. वेदान्तात खोल बुडी मार अगदी ओलाचिंब हो. दु:ख करु नकोस व इतरांना पण देऊ नकोस. राम नेहमी तुझ्याबरोबर आहे. स्वामीजी बोलत होते नारायण स्वामी ऐकत होते. ऐकताना विरहाचा कोलाहल माजला होता. पुन:स्वामींच्या पायावर डोके ठेवून अश्रूंनी पाय भिजविले पुस्तके घेऊन स्वामींचा निरोप घेतला.

आश्रमात स्वामी व भोलादत्त दोघेच राहिले. स्वामी बराचसा वेळ लिखाणात घालवीत. टेहरीला थंडी फार तशातही स्वामी गंगेत स्नान करीत. भोला त्यांचे कपडे घेऊन जात असे. राम गंगेच्या कुशीत जातो तेव्हा त्याला बिलकुल थंडी लागत नाही. आईच्या उबदार कुशीत पडून राहावे असे वाटते. स्नानानंतर अल्पसे भोजन व विश्रांती पुन: गंगामातेच्या परिसरात सूर्यास्तापर्यंत मनसोक्त भटकणे.

एके दिवशी अमेरिकन विदूषी श्रीमती बेलमन त्याना भेटावयाला आली. अमेरिकेत त्या प्रथम अध्यात्म अध्यापनासाठी स्वामींकडे आल्या होत्या. स्वामींच्या वक्तव्याने त्या प्रभावित झाल्या होत्या. पुढे त्याना भारतात यावेसे वाटले अमेरिकेला परतण्यापूर्वी स्वामींना भेटून जाण्यासाठी आता आल्या होत्या. स्वामीजवळ मनमोकळी चर्चा केली. शंकाचे निरसन झाले. स्वामींचा निरोप घेऊन त्या परतल्या.

स्वामींचे लिखाण सतत चालू असे. ते भोलाला म्हणाले नारायण स्वामींना निरोप दे 'मजमूने खुदमंस्ती और तमस्सुके अरज' हा लेख लिहून पुरा करून होत आहे तो रविवारी येथून घेऊन जा. नारायण स्वामींना निरोप देऊन

भोला परत आला. नारायण स्वामी स्वामीजींचे दर्शन होणार म्हणून आनंदले.

**गंगेत आत्मसमर्पण :**

१० आक्टोबर १९०६ चा शनिवार उजाडला. स्वामीजी आनंदात होते. सकाळी लिखाण चालू होते. अकराच्या सुमारास लिखाण संपले. स्वामी स्नानाला निघाले. भोला नेहमी सारखे कपडे घेऊन त्यांच्यामागे गेला. एका खडकेवर उभे राहून गंगेकडे स्वामी पाहात होते भोलाने कपडे त्या शिळेवर ठेविले म्हणाला, स्वामीजी आज दिवाळीचा दिवस तसेच स्नान करू नका. मी तेलाने मर्दन करतो मग स्नान करा. आज मीही स्नान करणार आहे. स्वामी तिथेच दगडावर बसले भोलाने भरपूर मर्दन केले. त्यानंतर स्वामी गंगेत उतरले. पाण्याला स्पर्श करून गंगेला वंदन केले व बुडी मारली पाण्याला खूप ओढ होती. ते किनारी यावयास निघाले मात्र प्रवाहाचा जोर मोठा असल्याने जोरात हात मारत अखेरचा प्रयत्न केला. उलट एका भोवऱ्यात त्यांचे शरीर झेपावले. स्वामी खूप दमले. भोला पाहत होतो. स्वामींनी भोलाला हाक मारली हात उंच केला मी आईच्या कुशीत झोपी जात आहे तू जा ॐ ॐ ॐ स्वामींचा देह पाण्याखाली गेला. भोला जड पावलाने आश्रमात परतला त्या रडू कोसळले.

स्वामीना भेटायला शनिवारी संध्याकाळी नारायण स्वामी निघणार होते तोच टेहरीच्या महाराजांचा एक दूत धावत आला. आणि त्याने झालेला वृत्तांत कथन केला. ते एकदम गंभीर झाले. ते टेहरीला धावत आले व स्वामींच्या आश्रमात पोहोंचले त्यावेळी रात्रीचे आठ वाजले होते. तिथे भोलादत्तला मिठी मारली व त्याला विचारले असे कसे झाले. दोघेही अवाक् झाले. थोड्या वेळाने पूरणसिंग आले आश्रमात स्वामी लिहीत बसत तिथे गेले तिथे काही लिहिलेली पाने होती नारायण स्वामींचे तिकडे लक्ष गेले स्वामींनी उर्दूत लिहले होते.

मरणा तुला आनंद वाटत असेल तर रामचा देह खुशाल घेऊन जा. त्याची मला आता मुळीच पर्वा नाही. रामला अनेक शरीरे आहेत. तो कोणत्याही शरीराच्या इच्छेप्रमाणे उपयोग करील. चंद्र किरणाचे पांघरून मी सहज जगेन. डोंगरातील नद्या नाल्यांच्या वेगाने भार होवून फिरेन. समुद्राच्या लाटावर राम नृत्य करील. धुंदपणे वाहणाऱ्या वाऱ्याची झुळूक म्हणजेच राम आहे. उंच पर्वतावरून राम खाली आला त्याने मृताला जागविले. निद्रिताला जागविले दुःखितांचे अश्रू पुसले. त्यांना दिलासा दिला. रामने कुणाला स्पर्श केला नाही सर्वाहून राम अगदी वेगळा आहे.

ती रात्र सर्वांची गंभीर अवस्थेत गेली. रामाला आपण जाणार याची पूर्व कल्पना होती हे समजले. दुसऱ्या दिवशी सर्वजण गंगामातेच्या दर्शनाला गेले तेव्हा बऱ्याच अंतरावर स्वामीजींचा पार्थिव देह त्याना मिळाला. ते चैतन्यात विलीन झाले होते. अचेतन आकार जगाच्या दर्शनाला उरला.

श्री. शं. बा. मठ
६, कुमार आशिष, राम मारुती रोड,
वंदना बस स्थानकाजवळ,
ठाणे - ४०० ६०२.
दूरध्वनी : २५३३२०३०

●●●

दि
शा
नियमित
वाचा.

आपली
मते
जाणून
घेण्यास
आम्ही
उत्सुक
आहोत.

पुस्तक परिचय

# बुद्धाच्या शिकवणुकीचे संचित: धम्मपद

*गौतमबुद्धाच्या शिकवणुकीचे सार असणाऱ्या धम्मपद बद्दल - संपादक*

धम्मपद हे गौतम बुद्धाच्या शिकवणीचे सार आहे. ज्या ज्या देशांनी बुद्धधर्म अनुसरला आहे त्या देशांत दैनंदिन जीवनातील नित्य आचरणासाठी धम्मपद हा ग्रंथ मार्गदर्शक मानला जातो. संसारी जीवनाच्या आसक्तीतून निवृत्ती स्वीकारलेल्या प्रत्येक माणसाजवळ हा ग्रंथ असलाच पाहिजे. हे ग्रंथ केवळ बुद्धानुयायांनीच वाचला पाहिजे असे नाही, तर तो ग्रंथ ज्ञानाची आसक्ती असणाऱ्या सर्वांसाठी आहे.

इ.स.पू. ६ व्या शतकात बुद्धाचा एक राजपुत्र म्हणून जन्म झाला त्याचे नाव सिद्धार्थ होते तर कूळनाम गौतम होते. वंशपरंपरेनुसार तो राज्यशकट हाकणार होता परंतु राजधानी कपिलवस्तू शहरात फेरफटका मारताना काही दु:खद आणि क्लेशकारक प्रसंग पाहिल्यामुळे त्याची जीवनविषयक आसक्तीच नष्ट झाली.

वयाच्या २९ व्या वर्षी एका रात्री त्याने गृहत्याग केला, दु:खांच्या कारणासाठी आपला महाल सोडला, सहा वर्षे भटकंती करून त्यावेळी अस्तित्वात असलेल्या सर्व धर्मप्रणालींचा बारकाईने अभ्यास केला. खडतर उपासतापास केले परंतु ज्याचा शोध तो घेत होता ते मात्र त्याला गवसले नाही. शेवटी वयाच्या ३३ व्या वर्षी गयेला तो बोधी वृक्षाखाली ध्यानस्थ बसलेला असताना त्याला दिव्यज्ञानाची प्राप्ती झाली त्यानंतर त्यांनी आयुष्यातील पुढील पंचेचाळीस वर्षे प्राप्त झालेल्या दिव्यज्ञानाचा प्रसार केला व त्यासाठी संघाची स्थापना केली. वयाच्या ८० व्या वर्षी प्रदीर्घ व अर्थपूर्ण आयुष्य जगल्यानंतर त्यांचे असंख्य अनुयायांच्या उपस्थितीत महापरिनिर्वाण झाले.

बुद्ध अनुयायांसाठी बुद्ध हे कुणी देव नाहीत, दैवी अवतार नाहीत किंवा दिव्य संदेश देणारे देवदूतही नाहीत. ज्याला सर्वोच्च ज्ञान प्राप्त झाले आहे असे ते संबोधी आहेत गौतम बुद्ध म्हणजे ज्यांनी जगाला दु:खातून अंतिमत: मुक्ती मिळविण्याचा, म्हणजेच निर्वाणाचा मार्ग दाखविला असे ते जगत्गुरु आहेत. त्यांच्या शिकवणुकीला धम्म असे म्हणतात.

मुळात धम्म म्हणजे दु:खाचे अस्तित्व, दु:खाचे कारण आणि अंतिमत: दु:खापासून मुक्ती याचा मार्ग दाखविणारे श्रेष्ठ तत्त्वज्ञान.

कोणत्याही प्रकारची अंधश्रद्धा, रूढी, परंपरा यांना थारा न देणारा धम्म म्हणजे वास्तवाचे भान असलेले तत्त्वज्ञान आहे.

धम्माचे आचरण करणारा दु:खातून मुक्त होऊ शकतो, धम्मपद या ग्रंथाच्या २६ प्रकरणांतून बुद्धाच्या शिकवणुकीच्या विविध पैलूंचे दर्शन होते आणि ही प्रकरणे धम्मसत्यावर प्रकाशझोत टाकतात. धम्माचे मूलभूत सिद्धांत असलेली काही पदे मानवाच्या वैयक्तिक उत्कर्षासाठी अत्यंत प्रेरणादायी आहेत. माणसाच्या योग्यतेनुसार धम्मपद हा ग्रंथ त्याला घडवितो.

धम्मपदातील बुद्धाच्या शिकवणुकीची तीन मुख्य उद्दिष्टे आहेत- मानव जातीचे कल्याण, पुढील योनीत योग्य जन्म मिळणे आणि अंतिम सुखाची प्राप्ती. शेवटचे उद्दिष्ट हे दुहेरी आहे. ते म्हणजे अंतिम सुख हे साध्य आहे आणि ते मिळविण्याचा योग्य मार्ग म्हणजे सन्मार्ग.

---

सर्व माणसांना समान प्रतिष्ठेने जगण्याचा हक्क आहे. - अब्राहम लिंकन

पहिले उदिष्ट म्हणजे मानवजातीचे कल्याण आणि मानवी संबंधात दृश्य स्वरूपाची दृढता येणे. येथे मानवाने स्वत:शी व इतरांशी शांततामय मार्गाने कसे वागले पाहिजे. जेणेकरुन कौटुंबिक जबाबदाऱ्या पार पाडताना व्यक्तिगत आयुष्यात व समाज व एकंदरीतच विश्वात शांतता कशी निर्माण होईल याचे मार्गदर्शन आहे. धम्मप्रणालीतील नीतिमूल्यांची सारतत्वे आहेत. बुद्धाची शिकवण ही दैववादावर आधारित नाही त्यात मुख्यत: दोन मूलभूत गोष्टींचा विचार आहे एक म्हणजे, वैयक्तिक सचोटी व आनंद आणि दुसरे म्हणजे समस्त मानवसातीचे कल्याण उदा. पाप न करणे, पुण्यसंचय करणे, चित्त शुद्ध ठेवणे (१८३)

धम्मपदातील अन्य पदे आपल्याला काही अत्यंत सुस्पष्ट अशा मार्गदर्शकपर सूचना देतात. उदा. पंचशीलाचे पालन, ज्यात प्राणिहत्या न करणे, चोरी न करणे, व्यभिचार न करणे, खोटे न बोलणे, नशापान न करणे यांचा अंतर्भाव आहे. गतजीवनातील पापकृत्यांचा विचार न करता सन्मार्गाचे आचरण करणारा मानव जसा ढगांनी झाकलेला चंद्र त्यातून बाहेर आल्यावर प्रकाशमान भासतो तसा किर्तीवंत होतो, असे गाथा क्र. (५०,२३१) सूचित करतात.

बुद्धाची नीतीची शिकवण ही तर सर्व मानवी कृत्यांवर अधिराज्य गाजवणारी सर्वश्रेष्ठ शिकवण म्हणावी लागेल. वाईट कर्माचे फळ म्हणजे आसक्ती, द्वेष व औदार्य, विरक्ती, चांगुलपणा व समंजसपणा. आपण जाणीवपूर्वक केलेली कृत्ये एकवेळ आपल्या स्मृती पटलावरून नष्ट होतील, परंतु त्यांचे ठसे आपल्या मन: पटलावर कायमचे कोरले जातात असे धम्मपद सांगते.

मानवी जीवन म्हणजे केवळ जन्म आणि मृत्यू यांची पोकळीत घडणारी मालिका नसून प्रत्येक जन्म असतो. मानवाचा पुनर्जन्म वेगवेगळ्या योनींत होऊ शकतो आणि पुनर्जन्माचे कारण हे आपले कर्म असते. आपआपल्या कर्मानुसार आपला पुनर्जन्म होतो. चांगली कर्मे असतील तर उच्च योनीत जन्म होतो आणि वाईट कर्मे असतील तर नीचयोनीत जन्म होतो.

धम्मपदातील बुद्धाच्या शिकवणीची महत्वाची पायरी म्हणजे नीतीधर्माचे आचारण. स्वत:ची आंतरिक प्रगती, उच्च योनीतल पुनर्जन्म, आनंद, हर्ष आणि उल्हास यांची प्राप्ती नितीधर्माच्या पालनातून होते. परंतु संसारात स्वर्गीय सुखाची प्राप्ती आपल्याला झाली तरी ते मानवी जीवनाचे सार्थक नव्हे. या जगात सर्व काही अनित्य निरर्थक आहे. आणि अशा गोष्टींची लालसा धरणे यातच त्यांच्या दु:खाचे कारण आहे याची जाणीव असणारे, आणि बुद्धाच्या शिकवणुकीचे तंतोतंत आचरण करणाऱ्यांचे निर्वाण हेच अंतिम ध्येय असते, अशाच लोकांची जन्मजन्मांतरीच्या फेऱ्यातून सुटका होते.

धम्मपदातील शेवटची महत्त्वाची पातळी म्हणजे मोक्षप्राप्ती. त्यासाठी बुद्धाने चार आर्यसत्ये सांगितले आहेत. पहिले आर्यसत्य म्हणजे तृष्णेचे किंवा दु:खाचे वेगवेगळे अविष्कार होय. दुसरे आर्यसत्य म्हणजे तृष्णेमुळे दु:खाची निर्मिती होते व मनुष्यप्राणी या दु:खाच्या फेऱ्यात अडकतो. तिसरे आर्यसत्य म्हणजे तृष्णेपासून मुक्ती मिळवण्यासाठी बुद्धाने सांगितलेला अष्टांग मार्ग.

पुढे या अष्टांग मार्गाची शील, समाधी, आणि प्रज्ञा या तीन भागात विभागणी होते. शीलपालनाने विकारांवर नियंत्रण मिळवता येते. समाधी अवस्थेत चित्त शांत, शुद्ध व एकात्म होते आणि प्रज्ञेमुळे मनाला निर्विकारावस्था प्राप्त होते. या अष्टांग मार्गाचे आचरण करणे कोणत्याही मानवास सहज शक्य आहे. बुद्धांची ही शिकवण केवळ भिक्षूंसाठीच नव्हे तर सर्वसामान्यांसाठी सुद्धा होती. सर्व साधारण माणूस सुद्धा या मार्गाने प्रज्ञेच्या अंतिम चरमसीमेपर्यंत पोहचू शकतो. परंतु जे लोक संसारापासून मुक्त होऊन पूर्णपणे

---

खोट्याचे तीन प्रकार असतात. खोटे, पूर्ण खोटे आणि आकडेवारी - बेंजामीन डिझरॅली

आध्यात्मिक मार्गाचे अनुसरुन करतात आणि ब्रम्हचर्याचे जीवन जगतात त्यांच्यासाठी हा मार्ग सोपा आहे. म्हणूनच बुद्धाने संघाची स्थापना केली. या मार्गावर चालण्याचा जे लोक दृढ निश्चय करतात त्याला धम्मपदात संघ असे म्हटले आहे.

ज्यांनी या मार्गाचे अनुसरुन करुन आपले अंतिम ध्येय साध्य केले आहे, त्यांचा धम्मपदाने गौरव केला आहे. पहिली अवस्था म्हणजे बुद्धाच्या मार्गावरील परतीचा मार्ग नसलेला अंतिम टप्पा ज्यामध्ये साधकाला मरणमुक्तीचा पहिला कवडसा दिसतो आणि मुक्ती मार्गावर त्यांची खऱ्या अर्थाने वाटचाल सुरु होते. धम्मपदानुसार ही अवस्था देवादिकांपेक्षाही श्रेष्ठ दर्जाची आहे. या अवस्थेनंतरच्या दोन अवस्थांमध्ये विकारांचा ऱ्हास होत जातो आणि शेवटी विकार पूर्णपणे नष्ट होऊन निर्वाणाचे उदिष्ट तुमच्या दृष्टिपथात येते. चौथी आणि अंतिम अवस्था म्हणजे अर्हत, ज्याने सर्व विकारांवर विजय मिळविला आहे आणि जो सुखदु:खापासून मुक्त झाला आहे असा मानव धम्मपदानुसार आदर्श मानव ठरतो. अऱ्हत हे धम्माच्या शिकवणीचे मूर्तिमंत उदाहरण आहे. किंबहुना अऱ्हत कसा असावा याचा जिवंत वस्तुपाठ म्हणजे स्वत: बुद्ध. अऱ्हत म्हणजे जणू धम्मतत्वाचा जिताजागता वस्तुपाठच म्हणावा!

कुणाच्याही मार्गदर्शनाशिवाय बुद्धाने हा अत्यंत प्राचीन असा मार्ग शोधून काढला व असंख्य लोकांना शिकविला. बुद्धामुळे समस्त मानवजातीला मिळालेला हा अत्यंत अनमोल असा ठेवा आहे.

अशा या धम्मपदाची उच्चकोटीची शिकवण जास्ती जास्त लोकांपर्यंत पोहचावी, यासाठी आचार्य बुद्धरखित इंग्रजीत अनुवादित काही प्रती सुभाष एंगडे व त्यांच्या पत्नी सीमा एंगडे यांनी विनामूल्य वितरणासाठी पुनर्मुद्रित केल्या असून जिज्ञासूंनी १०२-१०२८७११ भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा किंवा subhash@yahoo.co.in या ईमेलवर मागणी नोंदविल्यास ते स्वखर्चाने जिज्ञासूंना धम्मपदाची प्रत उपलब्ध करुन देतील.

(हा लेख महंत आचार्य बुद्धरखित यांच्या इंग्रजी अनुवादासाठी, भिखू बोधी, श्रीलंका यांनी लिहलेल्या प्रस्तावनेचा सुभाष एंगडे यांनी केलेला स्वैर अनुवाद आहे.)

- सुभाष एंगडे
मुंबई

•••

## म्हणी विसरलेल्या

- ➢ आग्रह स्वर्गातला आणि पत्ता नाही ताकाला
- ➢ आडातला बेडूक समुद्राच्या गोष्टी सांगे
- ➢ आणि तो उसनवारी मिरवितो जमादारी
- ➢ आले आले रुखवत, कडाडला हंडा, उघडून पाहतात तो अर्धाच मांडा
- ➢ उतरंडीला नसेना दाणा, पण दादला असावा पाटीलराणा
- ➢ ऐट बादशहाची, धंदा भडभुंज्याचा
- ➢ कनवटी नाही पैसा आणि लोकांना म्हणे या बसा
- ➢ कवड्यांचे दान वाटले गावात नगारे वाजले
- ➢ खायला न खरवडायला, मशालजी रगडायला
- ➢ खायला न प्यायला फुलेल तेल न्हायला
- ➢ खायला न प्यायला नको, पण शिपाई नवरा असो
- ➢ खिशात नाही अडका आणि बाजारात धडका
- ➢ खिशात नाही पै, मनात गमजा लई
- ➢ गंध टिळे नायकाचे, घरी हाल बायकोचे
- ➢ घरात नाही एक तीळ आणि मिशांना देतो पीळ
- ➢ घरात नाही कवडी घेऊ मागे शालजोडी
- ➢ घरात नाही दाणा आणि मला पाटलीण म्हणा

- संग्रहातून

# मला उमगलेले गुरुदेव रविन्द्रनाथ टागोर.

''गीतांजलीतून''

मे १९१३ मध्ये गुरुदेव रवीन्द्र नाथांना नोबल पुरस्कार मिळाला. गीतांजलीचे अनेकांनी अनुवाद केले आहे. दिशाचे एक जुने वाचक 'असीम' यांना ही या शताब्दी निमित्ताने अनुवादाची प्रेरणा झाली या अंकासाठी त्यांनी दोन प्रार्थना निवडल्या आहेत - असीम

– संपादक

*The day is no more, the shadow is*
*upon the earth. It is time that I go to*
*the stream to fill my pitcher.*
*The evening air is eager with the sad*
*music of the water. Ah, it call me*
*out into the dusk. In the lonely lane*
*there is no passer by, the wind is up,*
*the ripples are rampant in the river.*
*I know not if I shall come back home.*
*I know not whom I shall chance to meet.*
*There at the fording in the little boat*
*the unknown man plays upon his lute.*

सरला आहे दिवस अन् सावल्याही आहेत लांबल्या
वेळ आहे जाहली पाणवठ्यावर जावयाची भरण्या
माझे उदक कुंभ. सांजवारा झालाय अधीर ऐकण्या
गीत संगीत झऱ्यांचे. पायवाटा जाहल्या
सुन्या पथिकांविना अन् वाराहि जणू थबकला.
अरे! पण हा तर साद घालतो आहे मला
या सांज वेळी. नदी किनारी मात्र उठती तरंगच
तरंग अनेकानेक नाही मात्र ठाऊक मजशी परतेन
का मी माझ्या घरी आणि हे ही न पुरते ठाऊक की
भेटेल मज का मज कुणी अनोळखी कुणी मात्र छेडीत
आहे सुर त्याच्या एकतारीवरी वाटते तो असेल परतत
होडीतूनी रोडावल्या ओघात नदीच्या

– असीम



*Mother, I shall weave a chain of pearls*
*for thy neck with my tears of sorrow.*
*The stars have wrought their anklets*
*of light to deck the feet, but mine will*
*hang upon the breast. Wealth and*
*fame come from thee and it is for thee*
*to give or to withold them. But this*
*my sorrow is absolutely mine own,*
*and when i bring it to thee as my offering*
*thou rewardest me with thy grace.*

आई, मौत्तिकांच्या सरी सरींची गुंफीन माला
आणि घालीन तुझ्या गळ्यात,
अश्रु पूर्ण लोचन असतील माझे वेदनेने.
तारकांनी घडविलेत नुपूर प्रकाशाचे तुझ्यास्तव,
सजविण्या तंव चरण, परी माझी माला मात्र
विराजेल तुझ्या वक्षावरी
लौकीक आणि संपदा येई तुझ्यापासुनी
देणे आणि राखणे उभय माते हाती तुझ्या
परी दुःख मात्र आहे केवळ माझेच
अर्पितो जेव्हा तुला हे,
देशील मला तंव कृपा प्रसाद

– असीम

# VIDYA PRASARAK MANDAL, Thane

(VPM, Imparting Quality Education Since Last 75 Years)

Dr. Bedekar Vidya Mandir, Naupada, Thane (West) - 400602
Tel: 022-25426270, 022-25448768 email: vpmt@vsnl.net

*Congratulates All Successful HSC Students 2011-12*

Now Launching "The State of Art" Engineering College at Velneshwar

# VPM's Maharshi Parshuram College of Engineering

Velneshwar, Hedavi – Guhagar Road, Taluka Guhagar, District Ratnagiri - 415729,
Ph: 022-25426270, 022-25448768

## ADMISSIONS OPEN FOR 2012-13

**AICTE Approved, Engineering Degree Courses, Affiliated to University of Mumbai**

(Intake Capacity - 60 for each course)

- Mechanical Engineering
- Electrical Engineering
- Computer Engineering
- Instrumentation Engineering
- Electronics & Telecommunication Engineering

**Salient Features:**

- "The State of the Art" Laboratories & Library
- Latest WiFi enabled campus
- High speed Internet / Intranet connectivity
- Multi-utility Complex with Medical facility
- International Standard Hostel facilities
- Hygienic Food / Mess
- Gymnesium, Canteen, Laundry
- Picturesque, pleasant location near sea shore

**visit and enroll: http://www.vpmmpcoe.org email: vpmt@vsnl.net**

# VIDYA PRASARAK MANDAL, Thane

**(VPM, Imparting Quality Education Since Last 75 Years)**

Contact:- VPM Thane, "Jnanadweepa", Chendani Bunder Road, Thane College Campus, Thane (West) - 400 601 www.vpmthane.org

FOR ADMISSIONS APPLY ONLINE www.vpmthane.org

## V.P.M.'s POLYTECHNIC, THANE

Tel.: 25364494 / 25339872
email: vpmpoly@vpmthane.org

**3 YEARS (SIX SEMESTERS)**
**Engineering Diploma Courses**

Approved by AICTE, New Delhi and Affiliated to MSBTE, Mumbai. First Year Diploma admissions are done through CAP conducted by D.T.E.M.S., Students/Parents may contact the Admission In-charge directly for Institute level admission within 15 days of declaration of SSC results.

FIRST YEAR ENGINEERING DIPLOMA PROGRAMMES

- Chemical Engineering
- Industrial Electronics
- Computer Engineering
- Instrumentation
- Medical Electronics
- Information Technology
- Electrical Power Systems

Eligibility: S.S.C. Min 50% for Open Category and 45% for Reserved Category

DIRECT ADMISSION TO SECOND YEAR

Students should apply for admissions within 15 days of declaration of HSC results (as per the schedule displayed in Institute notice board).

Eligibility: H.S.C. (Voc.) Min. 50% for Open Category and 45% for Reserved Category.

ITI/ATS/MCVC: Min 60% for Open Category and Reserved Category.

OPPORTUNITY ABROAD for MSBTE Diploma holders at Northern College of Applied Arts and Technology - Timmins, Ontario, Canada

- Advanced Diploma in Electrical Engineering
- Industrial Diploma in Instrumentation
- College Diploma in Computer Engineering

## V.P.M.'s B. N. BANDODKAR COLLEGE OF SCIENCE

Tel. : 25336507, 25337672
email: prinbnb@vpmthane.org

**(RE-ACCREDITED BY NAAC - A)**
**Best College Award, University of Mumbai**

POST GRADUATE COURSES

- **M.Sc.** (By Papers) in Physics, Organic Chemistry
- **M.Sc.** (By Papers) in Information Technology, Environmental Science
- **M.Sc.** (By Research) in Physics, Chemistry, Botany, Zoology
- **Ph.D.** in Physics, Chemistry, Botany, Zoology

UG / POST HSC COURSES – Duration : 3 Years

- **B.Sc.** in Information Technology, Computer Science, Biotechnology, Biochemistry, Microbiology
- **B.Sc.** in Physics, Chemistry, Mathematics, Statistics, Botany, Zoology.

Yashwantrao Chavan Open University Courses

- **B.L.I.Sc.**
- **M.L.I.Sc.**

## V.P.M.'s Dr. V. N. BEDEKAR INSTITUTE OF MANAGEMENT STUDIES

Tel. : 25446554 / 25364492
www.vnbrims.org

**M M S**
**MASTER IN MANAGEMENT STUDIES**
AICTE Approved (Mumbai University affiliated)
2 Years Full Time
Eligibility: Admission through DTE.
Graduate with at least 50% marks

**PGDM**
**POST GRADUATE DIPLOMA IN MANAGEMENT**
AICTE Approved 2 Years Full Time
Graduate with at least 50% marks
Eligibility : CAT / MAT / XAT /ATMA / MH-CET

## V.P.M.'s K.G. JOSHI COLLEGE OF ARTS & N.G. BEDEKAR COLLEGE OF COMMERCE

Tel. : 25392072 / 25332412
email: jbc@vpmthane.org

**(RE-ACCREDITED "A" GRADE BY NAAC)**
**POST GRADUATE COURSES**
(Affiliated to University of Mumbai)

**BACHELOR OF LIBRARY & INFORMATION SCIENCE (B.Lib.I.Sc.)**
Eligibility : Any Graduate ( B.A./B.Com /B.Sc )
Duration : One Year

**MASTER OF LIBRARY & INFORMATION SCIENCE (M.Lib.I.Sc)** Eligibility : B.Lib.I. Sc.(Open Category - 50% & Reserved Category - 45%) Duration : One Year

**MASTER OF COMMERCE (M.Com)** in
** BUSINESS MANAGEMENT **
** ADVANCED ACCOUNTANCY **
** BANKING & FINANCE **
Eligibility : Commerce Graduate Duration : Two Years

**MASTER IN COMMUNICATION & JOURNALISM (MCJ)** (PERMISSION AWAITED)

**POST H.S.C. DEGREE COURSES**
Duration: 3 years (Affiliated to University of Mumbai)

**BMS - (Bachelor of Management Studies)**
Eligibility : XII Pass (Open Category - 45% & Reserved Category - 40%)
( Any Faculty - Commerce, Science, Arts) / Engineering Diploma)

**BMM - (Bachelor of Mass Media)**
English & Marathi Medium
Eligibility : XII Pass ( Any Faculty – Arts, Commerce, Science)

**B.Com.** (Banking & Insurance)
**B.Com.** (Accounting & Finance)
**B.Com.** (Financial Markets)
Eligibility : XII Commerce (Open Category - 45% & Reserved Category 40%)

**B.Com (Bachelor of Commerce)**
Eligibility : XII Commerce

**B.A. (Bachelor of Arts)** Eligibility : XII Arts
**B.A. Sanskrit** (Bachelor of Arts in Sanskrit- 6 papers)
**B.A. Psychology** (Bachelor of Arts in Psychology-6 papers)

## V.P.M.'s AUTONOMOUS PROGRAMS

Tel. : 25446554 / 25364492
www.vnbrims.org

**EpMBA (Phama / General)**
4-SEMESTER WEEK-END EXECUTIVE PROGRAM
For working Executives - Grad with 2 Yrs. exp. pref.

**Fast Forward EpMBA (Pharma / General)**
2-SEMESTER WEEK-END EXECUTIVE PROGRAM
For working Executives - Grad with 2 yrs. exp. Pref.

**POST GRADUATE PROGRAMS IN**

- Foreign Trade - 6 Months
- Intellectual Property Rights - 1 Year
- Banking & Insurance - 6 Months
- Tax Management - 6 Months
- Supply Chain & Logistics - 6 Months
- Information Technology Systems - 1 Year
- Certificate Program in Retailing - 6 Months

**Intensive Foreign Languages Courses**
French, German, Japanese and Chinese
Regular & Vacation Course Jan - Apr - July - Oct

## V.P.M.'s ADVANCED STUDY CENTRE

Tel. : 25339871
e-mail: asc@vpmthane.org

PART TIME POST GRADUATE DIPLOMA

- **Applied Analytical Chemistry**
  Eligibility: Bsc / B Pharm
- **Drug Regulatory Affairs**
  Eligibility: Bsc / B Pharm
- **Gardening & Landscape Designing**
  Eligibility: Any Graduate
- **Applications of Statistics**
  Eligibility: Any Graduate
- **Industrial Automation**
  Eligibility: B.Sc.- Physics / Diploma in Engg.
- **Hospital Administration**
  Eligibility: Any Graduate

**HANDS ON PRACTICAL TRAINING ON**
Gas Cromatography (G.C.)


सर्व माध्यमे लोकांच्या जीवनात कृत्रिम जाणिवा आणि मूल्यांची मनमानी पेरणी करत असतात – मार्शल मॅक्लुहान

वर्तमानात आपण काय करतो त्यावर भविष्य अवलंबून आहे – महात्मा गांधी

# श्रीरामचरितमानस: एक अमृतानुभव

*तंत्रनिकेतनाचे माजी प्राचार्य एस. एस. मजुमदार यांची लेखमाला या अंकापासून सुरू करत आहोत. त्यांतील हा प्रस्ताविक लेख - संपादक*

आज माघ शुद्ध द्वादशी सच्चिदानंद सदगुरू श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराजांचा जन्म दिवस आजपासून त्यांना आवडणाऱ्या रामरायांच्या उपासनेत थोडी भर पडावी म्हणून श्री. तुलसीदासांनी लिहिलेल्या ''**श्रीरामचरितमानस**'' ह्या ग्रंथातील मला आवडलेल्या व माझ्या अल्प बुद्धीला कळलेल्या काही गोष्टींचे विवेचन करण्याचा हा अल्प प्रयत्न.



आमच्या घरी आमच्या वडीलांपासून राम उपासना सुरू होती. वडील अध्यात्म रामायण, दासबोध, आत्माराम, मनाचे श्लोक, व श्रीरामचरितमानस वाचीत. त्यांची समर्थांवर अपार श्रद्धा होती व त्यामुळे त्यांच्यावर रामरायांची कृपा होती. अर्थात त्यांची भक्ती आणि उपासना फारच उच्च दर्जाची होती. पण त्यामुळे आमच्या घरी वातावरण रामभक्तीमय होते. आमची आई शिव - लीलामृत अकरावा अध्याय, मनाचे श्लोक रामदास स्वामींची करुणाष्टके श्रीरामचरित मानस ह्यांचे रोज पठण करीत असे. दोघे वडील बंधु अध्यात्म रामायण वाचीत. पण अध्यात्म रामायण संस्कृतमध्ये होत आणि मला संस्कृत येत नव्हंत. पण रामभक्तीची ओढ तर होतीच. मग वडीलांनी श्री. रामचरीतमानस वाचण्याची सूचना केली आणि तोच माझ्या आयुष्यातला सुखद क्षण ठरला. अर्थात त्यावेळी रामायण काहीच कळत नव्हतं. ह्याचा अर्थ आज खूप कळतं अस मुळीच नाही. श्री. तुलसीकृत रामायण कळायला रामरायांचीच कृपा लागते. तुलसीदासांनी रामायणाची रचना करताना स्वांत् सुखाय तुलसी ''रघुनाथ गाथा'' असं लिहलं आहे. त्याचप्रमाणे रामायण वाचून आनंद मिळतो, त्यासाठी ते वाचायचं.

खूप वेळा मनात येतं की श्री. ज्ञानेश्वरांची ज्ञानेश्वरी इतकी अवघड आहे की माझ्या सारख्या सुशिक्षित व्यक्तीला तिचा अर्थ कळायला अवघड जातो. तर पंढरपूरला जाणाऱ्या त्या वारकऱ्याला ती किती कळत असेल. पण हेच माझं अज्ञान आहे. ज्ञानेश्वरी वाचण्यातच त्याचा आनंद आहे. मग अर्थाकडे कोण लक्ष देणार. आमचे एक स्नेही रामायण वाचणारे तर याही पुढे गेले होते. रामायण वाचताना कधीही न चुकता श्री. हनुमानजींसाठी आसन ठेवण्यात येत. कारण

*''यत्र यत्र रघुनाथ किर्तनम*
*तत्र तत्र कृत मस्तकांजलीम्*
*बाष्प वायुपरी पूर्ण लोचनं*
*मारुती नमत राक्षसकांतम्''*

हेच आहे. रामायणांचा पाठ होत असताना श्री. हनुमानजी नतमस्तक होऊन ते ऐकत असतात. अर्थात हा प्रत्येकाच्या श्रद्धेचा आणि विश्वासाचा भाग आहे. पण वडीलांचे ते स्नेही नेहमीच **''हम तो भगवानको पाठ सुनाते हैं''** असंच म्हणायचे मग रामायणाचा अर्थ समजायचा प्रश्नच उद्‌भवत नसतो. ते एक प्रकारचं व्रत असे आणि त्याचा आनंद वर्णन करताच येत नाही. तो अनुभवावा लागतो.

साधारण १० वर्षांच्या वयापासून रामायण वाचू लागलो. पण त्यावेळी भक्ती वगैरे असा काही भाग नव्हता. बऱ्याच वेळा रामायण वाचलं तर आपण परीक्षेत नक्की पास होऊ असा समज होता. अर्थात मला अभ्यासांत गती नव्हतीच. पण पास होण्यापुरते छान आणि बाकी सर्व राम भरोसे असा प्रवास बरेच दिवस चालला होता. पण अभ्यास केलाच नाही तर पास होणारच नाही, हे कळल्यानंतर थोडे तिकडे लक्ष दिल्या जाऊ लागले. जेवढे रामायण वाचन आवश्यक होते ते सुरूच होते. पुढे जसे दिवस जात होते तसे वयानुरूप सर्वच गोष्टी होत गेल्या. शिक्षण झालं, नोकरी, लग्न, मुलांची शिक्षणं, त्यांची लग्न, त्यांच्या नोकऱ्या, त्यांची मुलं हे सर्व झालं. पण ह्या प्रत्येक प्रसंगी रामरायांची कृपावृष्टी होतच होती. सर्व गोष्टी सुरळीत झाल्या ही त्यांचीच कृपा. पण इतकं सगळ होऊनही खऱ्या अर्थाने निवृत्ती आली नाही. खऱ्या अर्थाने अनन्य शरणागती आलेली नाही. अजूनही छोटीशी जरी अडचण आली तरी मन विचलित होतं कारण भक्तीच्या अंतिम परीक्षेत आपण उतरत नाही हे प्रत्येक क्षणी जाणवते. असो. ही माझी स्वत:ची दुर्बलता. आत्मस्तुती जशी चांगली तशी आत्मनिंदाही योग्य नाही. आपण स्वत:ला कमी दर्जाचे का होईना भक्त समजावं. मग त्यांची जबाबदारी जास्त.

ह्या लेखनाचा मुख्य उद्देश मनात का व कसा आला हे महत्वाचे. आमचे मोठे चिरंजीव चि. शार्दूलने असे सुचवले की तुम्ही इतकं रामायण वाचता त्यावर काही लिखाण करा. तुम्हांला जे सुचेल ते लिहा. पण काही तरी लिखीत स्वरुपात येऊ दे. तीही एक प्रकारची भक्तीच आहे. आणि म्हणून आपल्याला **''श्रीरामचरीतमानस''** ह्या ग्रंथात जे आवडले ते लिहण्याचा छोटा प्रयास. तो एक अद्‌भुत ग्रंथ त्यावर टिपणी करण्याची माझी मुळी योग्यताच नाही. पण काही गोष्टी इतक्या सुंदर आहेत की त्यांचा आनंद मी जसा अनुभवला तसा इतरांना मिळावा ही माफक इच्छा. मी रामायणाचा मराठी अनुवाद करणार नाही कारण ते काम एका रामभक्ताने अगोदरच केले आहे. गीताप्रेस गोरखपूर प्रकाशना तर्फे ते प्रकाशित झालेले आहे. त्यामुळे त्याचे समग्र वाचन केल्यानंतर माझा प्रयत्न फारच छोटा वाटेल. पण माझे हे चार शब्द वाचून मूळ **''श्रीरामचरित मानस''** वाचण्याची बुद्धी आणि श्रीरामरायांची कृपा झाली तर हे कठीण काम केल्याचे सार्थक होईल.

आपल्या महाराष्ट्रात संतवाङ्मय खूप सुंदर आणि वाचनीय आहे. श्री. ज्ञानेश्वर माऊलींची ज्ञानेश्वरी, दासबोध, श्री. साईचरीत्र, श्री. गजानन विजय, राम विजय, हरि विजय आणि इतर किती तरी ग्रंथ आहेत. सर्वच वाचनीय आहे आणि सर्वच ग्रंथ माणसाला हरीभक्तीकडे जाण्याचा मार्ग दाखवतात. त्या सर्व ग्रंथाच्या तोडीचा **''श्रीरामचरितमानस''** हा ग्रंथही महान आहे. पण तो हिन्दीत किंवा **''अवध''** भाषेत लिहला गेलेला आहे. त्यामुळे महाराष्ट्रात त्याचा फारसा प्रचार झालेला दिसत नाही. पण उत्तरप्रदेशात घराघरात रामायणाचा पाठ अविरत होत असतो. प्रत्येकाने आयुष्यात एकदा तरी रामायणाचा पाठ अवश्य करावा असा माझा सगळ्यांना आग्रह आहे आणि तो वाचनीय ठराव यासाठी ही पूर्वपिठीका.

**''श्रीरामचरितमानस''** ह्या ग्रंथात सात कांड आहेत ते अनुक्रमे बालकांड, अयोध्याकांड, अरण्यकांड, किष्किंधा कांड, सुंदरकांड, लंकाकांड आणि शेवटचे

---

जो माणूस मानसिक आणि वैचारिक पातळीवर स्वर्गात जाऊन आला नाही तो कलाकार असू शकत नाही.

– विल्यम ब्लेक

उत्तरकांड ह्या सातही कांडाचे वाचन स्वत:च्या सोईनुसार करता येते. त्यांत सुरूवातीचे संस्कृत श्लोक, चौपाई, छंद, सोरठा, दोहा इत्यांदी आहेत. बालकांडात साधारण ३६१ दोहे अयोध्याकांडात ३२६ दोहे, अरण्यकांडात ४६ दोहे, किष्किंधाकांड ३० दोहे, सुंदरकांडांत ६० दोहे, लंकाकांडात १२१ दोहे, आणि उत्तरकांडात १२६ दोहे. दोन दोह्यांत साधारण ८ चौपाई आहेत. साधारण समजून वाचल्यास रामायणाचा एक पाठ करायला ३ महिने लागतात. मासपारायण सुद्धा करता येते. खूप वाचन आणि पठण झाल्यावर **'नऊ दिवसांत'** सुद्धा पारायण केले जाते त्याला **'नव्हानपारायण'** असे संबोधतात त्यासाठी साधारण रोज २ ते ३ तास वाचन करावे लागते, नित्य पाठ करण्याऱ्यालाच ते शक्य आहे. आणि असा पाठ करणारे फारच भाग्यवान. पण आपण प्रथमच **'रामायणाचे मनन'** करणार आहोत म्हणून आपण त्रैमासिक पारायणाचे टप्पे बघणार आहोत. ह्या विवेचनात प्रत्येक टप्प्यांत वर्णन केलेल्या प्रसंगाचे आपण सौंदर्य बघणार आहोत. सगळ्यात चौपाई, दोहे अवर्णनीय आहेत. पण मला आवडलेल्या चौपाई दोह्यांचे सविस्तर उल्लेख करू. मूळ उद्देश तुम्हांला प्रत्येक चौपाई दोहे वाचायचा मोह व्हावा तसं झालं तर रामरायांची कृपा. न झाल्यास पूर्ण दोष माझा कारण शिवधनुष्य उचलण्याचा अवघड प्रयत्न. पण त्यांची कृपा झाल्यावर

*''गरल सुधा रिपू कराई मिताई*
*गोपद सिंधु अनल सितलाई''*

हा माझा अनुभव.

**प्रा. एस. एस. मुजुमदार**
माजी प्राचार्य
वि.प्र.मंडळाचे, तंत्रनिकेतन ठाणे

●●●

## जे. कृष्णमूर्ती

### १ मे हा जे. कृष्णमूर्तींचा जन्मदिवस

''सत्य हेच परमेश्वर असून त्याच्या प्रचितीसाठी मला कुणाला गुरु करायचं नाही आणि कुणाला शिष्यही करायचं नाही'' हे तत्त्व त्यांनी स्वत: अपले परलोक, परमेश्वर, पुनर्जन्म हे वाद बाजूला सारून 'आपलं तिन्ही लोकातील जिणं समृद्ध कसं होईल? हा आपल्या चिंतनाचा गाभा मानला.' पारंपारिक, आध्यात्मिक संकल्पना आणि रूढी नाकारून स्वतंत्र विचाराचा मार्ग त्यांनी जगापुढे ठेवला. त्यांनी सांगितलेले तत्त्वज्ञान तत्कालिन, धार्मिक संकल्पनांना तडा देऊन गेलं. साऱ्या मानवजातीला सामावून घेणारं नवीन तत्त्वज्ञान त्यांनी लोकांसमोर मांडलं.

'करर्ट ॲन्ड सिग्निफिकन्स ऑफ लाईफ' 'कॉमेंटरीज् ऑफ लिव्हिंग', कॉमेंटरीज् ऑफ लिव्हिंग' 'लाइफ अहेड' 'फ्रिडम फ्रॉम द नोन', 'द अर्जन्सी ऑफ चेंज' 'द ओन्ली रेव्होल्युशन' इ. महत्त्वपूर्व ग्रंथ त्यांच्या नावावर आहेत. त्यांची भाषणं, संवाद, पत्रं, रोजनिशी इ. सारं ७० पुस्तकातून उद्धृत केलेलं आहे. या व्यतिरीक्त ध्वनिफित आणि दृक्‌श्राव्य फितींच्या साह्याने सर्व सांभाळून ठेवण्यात आलं आहे.

- संग्रहातून

# भारतीय संस्कृती - बीज, मॉडेल व साधना

*या प्रदीर्घ लेखमालेतील अध्यात्मवादाच्या एका वेगळ्या पैलूचा विचार केलेला आहे - संपादक*

**प्रास्ताविक :**

मला महर्षी, महायोगी अरविंदाच्या विचारांचे जे आकलन झाले त्यावर आधारित ही लेखमाला आधारली आहे.

**मूळ प्रश्न**

१) मानवाचा स्वत:च्या अस्तित्वाचा गूढ व रहस्यात्मक जन्म व मृत्यू याचा शोध

२) या विश्वाच्या निर्मात्याचा व त्याच्या निर्मीतीतीलच ह्या चंद्र, सूर्य , ग्रह, तारे, धूमकेतू यांच्या अस्तित्वाचा, भ्रमणाचा व त्यांच्या आपल्यावर होणाऱ्या प्रभावाचा शोध

३) मानवाला प्राणी वा वनस्पती ह्या योनींच्या चैतन्यापेक्षा, स्वत:ला असलेल्या चैतन्याचा अर्थ, व त्याच्या सत्य व अनंततत्त्वावर आधारलेल्या 'ज्ञानाचा' शोध

४) आणि मानवाला स्वत:च्या मर्त्य शरीर यंत्रणेचा शोध

५) त्यांची मदत व आधार ज्या स्वत:च्या अस्तित्वातील नाम रूपाचा व अनंततत्वाचा जीवात्म्याचा बोध व ज्ञान ह्या सर्व प्रश्नांचा शोध

**ह्या 'आत्मा व परमात्मा नाकारणाऱ्या निष्पक भौतिकवादाने व त्यावर आधारलेल्या बंदिस्त भौतिक शास्त्राने, लागणे अशक्य आहे. तसेच ह्या मर्त्य, नश्वर पृथ्वीतत्त्वावर वावरणाऱ्या जीवनाला अर्थहीन व माया संबोधून व 'निवृत्तिपर उपदेश' करणाऱ्या तत्वज्ञानाने व केवळ बौधिक ज्ञान मार्गाने, हे शोध लागणे सुद्धा दुरापास्त आहे असे स्पष्ट विचार महायोगी अरविंद घोष यांनी हिरीरीने मांडले.**

ह्या विचारांच्या मागे त्यांच्या नवीन अध्यात्मवादाचा जो त्यांनी स्वसंशोधित पुनर्रचित केला, त्याचा पूर्ण आधार आहे.

ह्या अध्यात्मशास्त्राविरुद्ध उभ्या राहिलेल्या भौतिकवादी विचारांतील <u>दोन नकारात्मक भूमिका</u> ते खोडून काढतात. एक म्हणजे, जे भौतिकवादी तत्वज्ञ, विचारवंत फक्त जड व भौतिक वस्तूंनाच सत्य Reality मानतात, ते त्या वस्तूंच्या अस्तित्वाच्या 'उगम' (Birth) व त्या वस्तूच्या नाशिवंत अस्तित्वाचा किंवा नश्वरतेच्या सत्याचा, अर्थ सांगू शकत नाहीत!!

तसेच, ह्या पृथ्वीवरील जीवनाच्या हृदयांतर्गत, मानसिक भावनिक, व इंद्रिय जाणीव, सुख, दुःख, भावना, सौंदर्य, कला यांचा खरा अर्त लावू शकत नाहीत. त्यांचे अस्तित्व व जाणीव नाकारू शकत नाहीत. त्यांची यंत्रवत, कोरडी, निष्प्राण शास्त्रे, उदाहरणार्थ पदार्थविज्ञान, गणित वगैरे ह्या प्रश्नांचा खरा अर्थ व मर्यादित सत्य अस्तित्व, Reality चा अर्थ जाणू शकत नाहीत <u>मानवी बुद्धीला पूर्ण अर्थ बोध देऊ शकत नाहीत.</u>

**मानवी चैतन्यशक्तीची सात्विक उंची वाढवणे :**

**कारण, ह्या सर्वांचे उत्तर जाण ही Consciousness चैतन्यशक्तीच्या मार्फतच शक्य**

आहे! भारतीय वेदिक ज्ञानातील, 'मांण्डूक्य उपनिषदातील' दोन श्लोकांचा अरविंद उल्लेख विशेषत्वाने करतात.

''सर्वं हयेतद् ब्रह्म। अयमात्मा ब्रह्म। सोयमात्मा चतुष्पान।। निश्चय यह सब ब्रह्मही है। यह आत्मा ब्रह्म है। यह आत्मा चतुष्पात् – चार पदवाला है।।''

*''नान्त:प्रज्ञं न बहि:प्रज्ञं नोभयत: प्रज्ञं*
*न प्रज्ञानघनं न प्रज्ञं नाप्रज्ञम्।*
*अदृष्टमव्यवहार्यम ग्राह्यमलक्षणम*
*चिन्त्यमव्यपदेश्यमेकात्म्य प्रत्ययसारम्*
*प्रप्रंचोपशमं शान्तं शिवमद्वैतम्,*
*चतुर्थं मन्यते स आत्मा स विज्ञेय: ।।७।।*

भाषांतर :

'' न भीतर की ओर प्रज्ञाबुद्धीवाला, न बाहर की ओर प्रज्ञावाला न भीतर और बाहर दोनों ओर प्रज्ञावाला न उत्कृष्ट प्रज्ञावाला न प्रज्ञावाला न प्रज्ञारहित अदृष्ट व्यवहार में आने के अयोग्य अग्राह्य, जिसका लक्षण न हो सके अचिन्त्य, अनिर्वचनीय एकात्म – प्रत्ययसार अर्थात वह केवल आत्मा है, यही प्रतीति जिसका सार है, प्रपंच जाग्रतादि अवस्थाये जहाँ शान्त हो जाती है, शान्त, आनंदमय, अतुलनीय चौथा तुरीयपाद मानते है वह आत्मा है और वह जानने योग्य है।।७।।

२ऱ्या श्लोकांत चार अवस्था चतुष्पात ब्रह्मांच्या सांगितल्या त्या अशा होत्या

१) यह सब ब्रह्म है (ब्रह्मंड)
२) यह सब (ईश्वर) ब्रह्म (महान) है।
३) ब्रह्म के चार पाद है।
४) ह्यांतील चौथी अवस्था जी ब्रह्माची आहे ती ''तुरीयावस्था'' आहे.

ही योगी साधकाला ज्ञान होते. पण ती क्रिया संयम साधना व तपस्येनेच प्राप्त होऊ शकते, केवळ तीव्र बुद्धीने नव्हे. मानवाच्या या बुद्धीयंत्राला हे अशक्य आहे. व हे बुद्धीवान त्या ब्रह्माला सत्यावस्था (Reality) नाकारतात.

तेव्हा अरविंद म्हणतात.

<u>"This denial of the 'Supra sensible' as necessarily an illusion or a hallucination depends on the constant sensuous association of the real with only the materially perceptible.</u>

'' इंद्रियातीत अनुभूतीच्या 'नकारत्वावर' आधारलेला अर्थ, ते सर्व ही अनुभूती भ्रमात्मक वा भासात्मक अशी मानतात.

कारण, उघड आहे कीं, फक्त जड व दृश्य वस्तूंशी इंद्रियांच्या जड स्थितीचाच प्रत्यय घेण्याचा त्यांच्या प्रवृतीमुळे <u>त्यांना सत्याची जाणीव होत नाही!</u>''

**Two means helpful for forth or evolution :**

जे अनंतत्वावरील स्थितीतील **वैश्विक सत्य** आहे ते **व्यक्त स्वरुपांत** अनेक प्रकारांनी उत्कांति पद्धतीने उतरते **महायोगी अरविंद दाखवून देतात कीं मानवाच्या बाबतीत ही उत्क्रांति दोन पद्धतीने होत असते.**

एक म्हणजे बाह्य जड अस्तित्वातील प्रगती व दुसरी म्हणजे अदृश्य पद्धतीतही **'जीवात्म्याच्या स्तरावर'**

**मानवी आत्मिक उन्नती अटळ :**

पुढे ते असे मानतात कीं मानवाच्या आत्मिक उच्चतम उद्धाराचा मार्ग व प्रगती ही अटळ आहे. हाच विश्वकर्त्याचा उद्देश आहे. हाच उद्धाराचा मार्ग आहे. हा उद्धार करणे हाच पुरुषार्थ आहे!!

**Cycle of Births :**

ह्या विश्वचक्रातील पुनर्जन्म व कर्मसिद्धांतावरील जीवन प्रवाह हे एकमेकांशी संबधित आहेत. 'आत्मिक प्रगतीचा' जे सिद्धांत वा जन्म पुनर्जन्म व कर्मसिद्धांत या संकल्पना मानल्या जातात त्याला ह्या दोघांतील नातेसंबधाला मान्यता देणे हे क्रमप्राप्तच आहे.

**तरच ही उत्क्रांती शक्य** आहे फरक, एवढाच आहे कीं पुनर्जन्मात पूर्व जन्मातील बाह्यात्कारी स्वभावस्थिती अवतारत नव्हे तर 'आंतरिक गुणात्मक आत्मिक स्थिती' जतन होते व पुढील प्रगतिशील मार्गक्रमणा नवीन जन्मात करते - **जीवात्म्याच्या उद्धाराचा हा 'रोड मॅप'** **Roadmap** आहे.

**कलियुगातील अडचणी :**

सध्या आपल्याला 'कलीयुगांत ज्या अनेक वादळात्मक व संघर्षात्मक प्रसंगांना तोंड द्यावे लागते आहे, त्यांचा उद्‍भव हा जीवात्म्यांचा आपसात व समष्टितील, सृष्टीतील समन्वयाचा अभाव, सुसंगतीचा अभाव, बेसूर जीवनपद्धती ह्यामुळे होतो.

त्याचे मूळ कारण शरीरबद्ध आत्म्याच्या अस्तित्वाचा व उद्धाराचा मार्ग न अनुसरल्यामुळे होत आहे.

**मर्यादांचे ऐतिहासिक दर्शन व अनुभव :**

ह्या पृथ्वीवरील इतिहासात मानवाची बौद्धिक प्रगती व भौतिकवादी पद्धतीने काही प्रगती झाली हे नाकारले जाऊ शकत नाही. पण, बुद्धी म्हणजे Intellect ह्याच्या काही मर्यादा आहेत. अव्यक्त, अदृश्य, इंद्रियातीत अशा आत्म व्यवहारांचा केवळ भौतिक बुद्धीवादाने तलास घेता येत नाही व त्यांचा प्रगतीचा मार्ग चोखाळता येत नाही. ह्या असामर्थ्यावर उपाय हा ह्या आत्म्याला जाणणे व त्याच्या आकांक्षा, हेतू व ध्येयाची जाणीव करून घेणे हे क्रमप्राप्त आहे.

**सत्य ज्ञानाची सत्य पातळी :**

ही ज्ञानाची पातळी उंचावणे हाच एक खरा मार्ग आहे. आपल्या ऋषी, मुनी, संत व अवतारांनी ह्या मार्गाचे दिग्दर्शन केलेले आहे. भौतिकात व सुखोपभोगांतच रमलेल्या अज्ञानी जनाला, समाजाला ह्या ज्ञानाचा स्पर्श नाही. हे ज्ञान शाळा कॉलेज, युनिव्हर्सिटी, राज्यशास्त्र, समाजशास्त्रातून बाद करण्यात आले आहे. थोडासा पुसटसा भाग जो भारतातील कुटुंब संस्था, चालीरिती, धर्माच्या पातळीवर आहे, तो विकृत तिरकस व कर्मकांडी झाला आहे. भौतिक जीवनस्पर्धेत व जगण्याच्या रोज कठीण व शोषण करणाऱ्या सामाजिक, राजकीय, आर्थिक व्यवस्थेतील भ्रष्टाचारी पद्धतीने ह्या प्रगतशील धोरणाचा व ज्ञानाचा प्रभाव लेखनातून करण्यात आला आहे. आपण एका खोल गर्तेत पडलो आहोत. तेथून उद्धाराचा मार्ग चोखाळणे हे महाकठीण काम झाले आहे. समाज नेतृत्वाला हे भान अजिबात नाही!

**तोडगा या उपाय कोणता?:**

मग या परिस्थितीवर तोडगा कोणता? ह्याचे उत्तर शोधण्याकरितां ह्या पृथ्वीवरील वैयक्तिक व सामाजिक परिवर्तनाचा इतिहास महर्षि अरविंदांनी तपासला हा इतिहास एका निष्प्राण, कोरड्या पद्धतीने या केवळ भौतिकवादी दृष्टीने बघितला गेला. बखरी, इतिहासे ग्रंथ व शिक्षणपद्धतीतील इतिहासाची शिकवणूक हेच दर्शविते.

सामाजिक इतिहास काय दर्शवितो?

जर्मन इतिहासतज्ज्ञ लॅम्प्रेचट (Lamprecht) ह्याच्या एका वैचारिक पद्धतीचे त्यांना आकर्षण वाटले. ती पद्धती म्हणजे समाजाची मानसिक प्रगती व त्याचे एकक प्रमाण शोधणे व त्यांच्या प्रगतीचा अभ्यास करणे.

हा अभ्यास करताना जगाने धार्मिक (organised Religion) सामाजिक शास्त्रे व वैज्ञानिक भौतिकवादी शास्त्रे,

व राजकीय व आर्थिक परिवर्तने यांचा अभ्यास केला.

ह्या प्रगती मार्गावर कांही समाधानकारक उत्तरेही मिळाली. उदाहरणार्थ, निरनिराळे धर्म जे केवळ मानवी अपूर्ण बुद्धी व आत्मज्ञानावर आधारलेले होते, त्यामुळे कांही बरोबर व चुकीची नैतिक मूल्ये उदयाला आली. त्यांचा आग्रह धरतांना त्या त्या देशात किंवा युरोप, आशिया आफ्रिका खंडात अतोनात हिंसा व जागतिक युद्धेही झाली. त्यांच्या बारकाव्यात किंवा इतिहासांत विशेष न शिरता, एक निष्कर्ष निघाला की जग एका प्रतती स्तरावरील कॉंशसनेसमधून निश्चितपणे थोड्या वरील अंशात्मक उंचीवर आला, पण त्या शोधाच्या अपूर्णत्वामुळे विनाश आपसातील आभीनिवेशी संघर्षात सापडला!

**ह्या दर्शनातील दोष :**

ह्या विश्वाच्या निर्मात्यबद्दल जे स्वरूप मांडण्यात आले ते उघडपणे अज्ञानी व बऱ्याच अंशी विकृतही व हिंसात्मक दिसण्यात आले. आजही ह्या उणीवा दृष्टोत्पत्तीस येत आहेत.

**धर्म व अध्यात्म – Religion and Spirituality फरक?:**

ह्याचे कारण 'धर्म' व 'स्पिरीच्युअॅलिटी' म्हणजे 'खरे अध्यात्म' (आत्मज्ञान)ह्यांच्या संकल्पनाबद्दलचे अज्ञान मानवी तर्कपद्धती ही 'Finite Logic' म्हणजे मर्यादित तर्कावर आधारलेली आहे. मानवाचे आयुष्यही मर्यादित, कल्पनाशक्तिही दुबळी क्षीण व अनंत तत्वावर आधारलेली व शुद्ध नसल्याने अपूर्ण व अज्ञानी!!

त्यामुळे Cousciosness मधील उच्च स्तरावर जाण्याची साधना सामाजिक स्तरावर न आल्याने वैयक्तिक अपूर्ण, छोटी व तोकडी साधने राबवली गेली. योग, तंत्र, मंत्र भक्ती ह्या व इतर मार्गांचा शोध व उपयोग हा होत होताच, पण तो अपूर्ण पडला. व अजूनही अपूर्ण व अपुराच पडतो आहे!!

**भीषण तत्वांचे ग्लोबलायझेशन :**

पण, ग्लोबलायझेशनच्या नवीन प्रभावाखाली हे जग येत असतानाच्या ह्या नव्या प्रभावांत राजकीय सत्तेची सामर्थ्य स्वरुपे दृष्टोत्पत्तीस आली, जी अत्यंत भीषण मानवी व इतर जीवनाच्या संहाराची निमीत्त झाली. मानवी समाज तंत्रज्ञानाने देशाच्या सीमा ओलांडून जवळ येऊ लागला व त्यातून राजसत्तेची, भोगवाद्यांची स्वप्ने 'उदंड' झाली मानवी स्वभाव आत्मिक स्तरावर उंचावला नाही आणि अपूर्ण व दूषित धर्मतत्व, देशाभिमान, पंथ, Race, Racial जातिधर्म व दूषित प्रगती संकल्पना ह्यांचा मिश्र वा एकांगी प्रभावात आपल्या संहाराच्या न्यूक्लीअर सर्वसंहाराच्या शस्त्राच्या जोगवर जगबुडी व मानवी चैतन्याच्या संपूर्ण नाशापर्यंत पोचला. पहिले व दुसरे महायुद्ध, जर्मनी रशिया व चीनमधील कम्यूनिझम, नाझीझम, 'कल्चरल रेव्हॅल्यूशन' वगैरे संकल्पनांवर आधारित सर्वनाशापर्यंत एका जगबूडीच्या कड्यावर येऊन उभा आहे. नूतन पाकिस्तानी आतंकवाद हा तर मानवी नैतिकतेचा भयानक अवतार आहे!!

**चर्चेने प्रश्न सुटतील? :**

हे कांही जुजबी सुटणारे प्रश्न नाहीत. किंवा ग्लोबलयझेशनमधील जागतिक स्वरुपावर व स्तरावर शोधणाऱ्या संस्था (युनायटेड नेशनस्, नॅटो, एशियाटिक, ट्वेंटीग्रुप वगैरे वगैरे संस्थांना सुटणारे प्रश्न नाहीत.

**मौलिक विचार व मार्ग आवश्यक :**

ह्या प्रश्नाच्या मुळाशी जाऊन मानवी स्वभावातील दोषांचा कसा पाडाव करावयाचा ह्या मुद्याचा विचार करण्याची वेळ आली आहे. अध्यात्मशास्त्राशिवाय पर्याय नाही!!

ही परिस्थिती महायोगी अरविंद यांनी जाणली पण, ती अगोरदरच ऋषी मुनींनी सुद्धा जाणली होती हे लक्षात घ्यावयाला हवे!!

**भारतीय ज्ञानाचा विसर कां? :**

मग त्यांच्या ज्ञानाचा व शोधाचा विसर का पडला? त्याचे, कारण एक तर त्यांच्या शोध संहितेचा अर्थ व बोध होण्यातील अक्षमता व अनुत्साह.

दुसरे म्हणजे दर प्रत्येक पिढीमध्ये ह्या मूळ बीजात्मक ज्ञानाचा संभाळ व प्रसार करणाऱ्या संस्थांचा समूळ नाश, हेच कारण दिसते.

**आत्मशून्य संस्कार क्रिया :**

संस्कार क्रिया आत्मशून्य झाल्या. प्रत्येक पिढीमध्ये जन्माला येणाऱ्या जीवात्म्यांना हे ज्ञान पूर्वजन्मातून काही अंशाने प्राप्त होते असे धरून चालल्यास त्या ज्ञानाची स्मृती जागवणे ही प्रक्रिया ज्या योगक्रियेने, साधनेने होते तिच्याबद्दलचे अज्ञान व त्या क्रियांचा पुनरुद्धार व संवर्धनाबद्दलची असहिष्णुता ही कारणे मुख्य आहेत.

एव्हढेंच नव्हे तर नवनवीन पिढीमध्ये 'रिले रेस' सारखे जे नवअनुभवाचे, नवज्ञानाचे 'बॅटन' पुढच्या जन्मात समाजाकडून मिळते त्या वैश्विक यंत्रणेच्या ज्ञानाबद्दल पूर्ण अज्ञान!!

महायोगी अरविंदांनी ह्या ज्ञानाला Integral Socialogy ह्या शास्त्रावर आधारलेले उत्तर दिले आहे. ते मुळातच किशोर गांधी यांच्या त्या इंग्रजी नावाच्या पुस्तकातून वाचा.

**जन्म पुनर्जन्म सत्याला नकार का? :**

जसा 'वैयक्तिक आत्मा Individual Soul हा जन्म जन्मांतरीचा प्रवास आपल्या आत्म्याच्या वैश्विक 'चक्राकार व मंडलाकार पद्धतीने करत असतो, तसाच त्याला संलग्न व आधारभूत असा Social Group Soul म्हणजे 'समष्टिचा आत्मा' हा चैतन्यशक्तीचा प्रकार ह्या Knowledge Transfer क्रिया वा 'ज्ञानाचे हस्तांतर' करत असतो. हे हस्तांतर समाजाकडून व्यक्तीकडे अनेक प्रकाराने, पद्धतीने घडत असते. त्याची स्पष्ट जाणीव आपल्याला होत नाही वा आपल्या शिक्षण संस्था व सामाजिक संस्था जाणीवपूर्वक करत असताना दिसत नाहीत व हे दुर्दैवच आहे. ह्या प्रचलित युगात ह्या जबाबदारीचा पूर्ण विसर पडला आहे.

त्याचे मुख्य कारण की मानवी ज्ञानाचा, उद्धाराचा हा जन्मजन्मांतरीचा मार्ग आहे. आत्म्याच्या स्तरावरील प्रगतीचा आहे या बद्दलचे अज्ञान व असहिष्णूता.

ह्याचे उघड कारण, भौतिकवादाचा विलक्षण, आसुरी प्रभाव व पगडा हा संपूर्ण जगावर आहे!!

**जागतिक कट कारस्थान :**

आणि, त्यांत बदल घडवण्याच्या आड सर्व जगातील राजकीय सत्ता एकत्र येऊन Conspiratorial म्हणजे कुटील कटपद्धतीने संकुचित भौतिक स्पर्धासाठी हत्या करत आहेत, ज्या कांही उत्स्फूर्त व जागृत व्यक्ती व समाज ह्या जबाबदारीची जाणीव होऊन कार्य करण्याची चळवळ करतात त्यांची मुस्कटदाबी, गळचेपी वगैरे निग्रप्रकार ह्या राजकीय सत्त्या मोठ्या हिरीरीने करीत आहेत!! कित्येक न्यायसंस्थाही त्या राजकीय सत्तांची धोरणे व नीती संभाळत आहेत. व तसे निर्णय देत आहेत.

**Dispute about Intelligent Designer :**

अमेरिकेतील **Intelligent designer** ह्या प्रकरणाचा अभ्यास केल्यास हे लक्षात येईल अमेरिकन न्यायसंस्थेने या वैश्विक निर्मात्याच्या संशोधनाचा

अभ्यासक्रमाला युनिव्हर्सिटी शिक्षण संस्थात सामील करण्याच्या विरुद्ध निर्णय दिला. तो देतांना त्या सुप्रीम कोर्टाने असे बजावले कीं -

**'This is a back door Entry to Religion' in the Education System**

**भारतीय अध्यात्मवाद्याचे पूर्ण दुर्लक्ष :**

दुदैव हे कीं अमेरिकेत हा अर्जदार ख्रिश्चन धर्माला तडाखा होता. पण जगातील अध्यात्म संस्थांना नव्हे. अमेरिकन न्यायसंस्थेचे हे वैश्विक अज्ञान आमचा देश शिरोधार्य मानत आहे.

भारतात असा प्रयत्न वैदिक ज्ञानाचे अर्ध्वर्यूंकडून वा हिंदू संस्थांकडून होताना दिसत नाही हे दुदैव आहे!! आणि, तसे झाले तर ह्या देशाची Constitution मधील पार्लमेंटरी सत्ता राजकीय सत्ता त्याला जोरकपणे व हृदयहीन स्वार्थी हेतूसाठी विरोध करील कदाचित सुप्रीम कोर्टातील बंदिस्त न्याय संस्थाही विरोध करीत. शिक्षण संस्थाचे तर नाव घ्यावयालाच नको. त्यांची साधी कामे सुद्धा त्या भ्रष्टाचारी पद्धतीने राबवत असताना दिसताहेत.

**अरविंदांचा अवतार व कार्य :**



श्री. अरविंद

पण, माझी खात्री आहे की जर महायोगी अरविंद ह्यांनी हे काम मनावर घेतले, (आजही त्यांचा आत्मा ह्या (विश्वात) अस्तित्वात आहे. तर, खऱ्या वेदिक व आत्मिक ज्ञानावर ह्या भारताला ह्या ज्ञानाचा स्वीकार करावयाला लागेल.

तसे झाले तर नुसता भारतालाच नव्हे तर जगाचा सर्व मानवी व इतर सृष्टीचा उद्धार एका दिव्य मार्गावर म्हणजे आत्मिक उन्नतीच्या मार्गावर वाटचाल करावी लागेल, आणि मग "The Divine Life" दिव्य जीवनाचा साक्षात्कार या पृथ्वीवर होईल!!

**श्री. यशवंत साने**
सोनल अपार्टमेंट,
सारस्वत बँकेशेजारी,
अग्यारी लेन, ठाणे.
दूरध्वनी - २५३६८४५०
मोबाईल - ९००४०५१८४७
E mail : Saneyr@mtnl.net.in

•••

## दिशासाठी

**आपले लेखन सहकार्य अपेक्षित आहे. आपल्या अध्ययन अध्यापन विषयांतील नवीन घडामोडी, नवीन ज्ञानक्षेत्रे यांबाबत सातत्याने लेखन करणे हे अध्यापनात साहाय्यकारी ठरणारे आहे.**

**तरी, आपणाकडून लेखन अपेक्षित करीत आहोत.**

**- संपादक**

तिसरे महायुद्ध कोणात व कसे होईल माहीत नाही; पण चौथे झाले तर ते काठ्या आणि दगडांनी लढले जाईल.
- अल्बर्ट आईन्स्टाईन

# परिसर वार्ता

## सौ. आनंदीबाई जोशी प्राथमिक विभाग

➤ युनिफाइड कौन्सिल, हैद्राबाद यांच्या तर्फे घेतल्या गेलेल्या NSTSE च्या दुसऱ्या स्तराच्या परीक्षेत कु. पल्लव खांडेकर याने अखिल भारतीय पातळीवर २७० वा क्रमांक पटकावला.

➤ क्रीडा विभाग अहवाल :

**टेबल टेनिस:** गुरुकुल फाउंडेशन आयोजित आंतरशालेय टेबलटेनिस स्पर्धेत कु. रसिका मोरे व कु. वैष्णवी गेज्जी यांनी सुवर्ण पदक पटकावले.

**बॅडमिंटन :** डी. वाय. पाटील संस्थेतर्फे आयोजित बॅडमिंटन स्पर्धेत कु. अदिती भावे हिला १३ वर्षाखालील मुली या गटात वैयक्तिक व सांघिक खेळात सुवर्ण पदक मिळाले. तसेच तिला उपविजेते पदाचा चषकही मिळाला. कु. मैत्रय चिपळूणकर याने (मुले १४ वर्षा खालील) या गटात रजत पदक पटकावले.

**ॲथलेटिक्स् :** मावळी मंडळ आयोजित आंतरशालेय ॲथलेटिक्स् स्पर्धेत १४ वर्षाखालील मुले या वयोगटात कु. वरुण निमकरला रजत पदक मिळाले.

**लॉन टेनिस :** जिमखाना येथे आयोजित लॉन टेनिस स्पर्धेच्या मुले (१२ वर्षाखालील) या गटात कु. गिरीश दिघेने उपविजेते पदाचा चषक पटकावला.

**स्केटिंग :** ठाणे जिल्हा स्केटिंग स्पर्धेच्या रिंक १ या स्पर्धेत कु. धिती बऊआ हिने तिसरा क्रमांक पटकावला व रिंक २ स्पर्धेत तिने दुसरा क्रमांक पटकावला. अखिल भारतीय स्केटिंग स्पर्धेतही तिने २ सुवर्ण व १ रजत पदक पटकावले.

## वि.प्र.मं. चे नगरपालिका विधी महाविद्यालय

दि. १२ एप्रिल २०१२ रोजी वि.प्र.मं. चे टी. एम. सी. विधी महाविद्यालयाचा वार्षिक समारंभ साजरा करण्यात आला. या समारंभासाठी प्रमुख पाहुणे म्हणून ॲड प्रकाश भोसले यांना बोलविण्यात आले होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. श्री. वि. करंदीकर, जेष्ठ सदस्य विद्या प्रसारक मंडळ, हे प्रकृती अस्वस्थ्यामुळे कार्यक्रमास हजर राहू शकले नाहीत.

या कार्यक्रमामध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक आणि क्रीडा यामध्ये प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते शैक्षणिक अभ्यासक्रमामध्ये गुणवंत ठरलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. त्यामध्ये

१) कु. डामरे ग्रिश्मा व निलाक्षी सागवेकर
प्रथम – तृतीय वर्ष विधी

२) कु. पतंगे जोत्स्ना – द्वितीय – तृतीय वर्ष विधी

३) श्री. यतिन पंडित – द्वितीय – तृतीय वर्ष विधी

II एल. एल. बी.

१) कु. अय्यर श्रीदेवी – प्रथम – द्वितीय वर्ष विधी

२) श्री. शहा मनिष – द्वितीय – द्वितीय वर्ष विधी

३) कु. भागवत शिल्पा – द्वितीय – द्वितीय वर्ष विधी

४) श्री भागचंदानी गिरीश तृतीय – द्वितीय वर्ष विधी

I एल. एल. बी.

१) श्री. जयेश गोखले – प्रथम – प्रथम वर्ष विधी

अरुणादित्य विष्णू के. धुरंधर सुवर्ण पदकाने सन्मानित

---

दोन प्रकारच्या शोकांतिका असतात पहिली हवे ते न मिळाल्याने होणारी आणि दुसरी हवे ते मिळाल्याने होणारी

– ऑस्कर वाइल्ड

२) कु. घोष कल्पिता- द्वितीय - प्रथम वर्ष विधी

३) कु. मिराशी प्रिया - तृतीय - प्रथम वर्ष विधी

या व्यतिरिक्त कु. अहिरे मनीषा यांना तृतीय वर्षामध्ये मागासवर्गीय विद्यार्थ्यांमध्ये प्रथम आल्याबद्दल गौरविण्यात आले. तसेच श्री. देसाई सुनील आणि खानोलकर रंगनाथ यांना तृतीय वर्ष एप्रिल २०११ या परीक्षेमध्ये पुराव्याचा कायदा या विषयामध्ये सर्वात जास्त गुण मिळविल्याबद्दल गौरविण्यात आले. त्याचबरोबर कु. कल्पिता शेष यांना संविधानिक कायदा (Constititional Law) या विषयामध्ये एप्रिल २०११ चा परीक्षेमध्ये प्रथम वर्ष विधी मध्ये सर्वाधिक गुण मिळविल्याबद्दल गौरविण्यात आले.

या कार्यक्रमामध्ये दरवर्षीप्रमाणे या वर्षी उत्कृष्ट शिस्तप्रिय विद्यार्थी म्हणून पुढील विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

१) जयेश गोखले आणि अलका माने - प्रथम वर्ष विधी

२) नम्रता बोबडे आणि राजकुमार गायकवाड - द्वितीय वर्ष विधी

३) आदिती आठवले आणि पूजा ओक - तृतीय वर्ष विधी

बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमानंतर प्रमुख पाहुणे ॲड. प्रकाश भोसले (अध्यक्ष, ठाणे बार असोशियेशन) यांनी आपले विचार व्यक्त केले आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी प्रा. पायक सर, प्रा. विनोद वाघ, प्रा. मिथुन बनसोडे, प्रा. मनिषा वाघ, प्रा. रश्मी आचार्य आणि इतर शिक्षकेतर सहकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला.

## डॉ. वा. ना. बेडेकर व्यवस्थापन अभ्यास संस्था

### गेल्या शैक्षणिक वर्षातील महत्त्वाचे कार्यक्रम

(१) २२-२३ जुलै २०११

**NATIONAL SALES WORKSHOP राष्ट्रीय विक्री व्यवस्था कार्यशाळा**

Mining The Gold There is Sales In Everything We Do म्हणजेच "विक्री व्यवस्थेची सार्वत्रिकता" या विषयावर आधारित कार्यशाळा. मान्यवरांनी प्रत्येक क्षेत्रात विक्री व्यवस्थापन कसे महत्त्वाचे आहे किंबहुना कोणत्याही क्षेत्रातील नोकरीच्या संधी शोधताना विक्री व्यवस्थापन कशाप्रकारे सर्वच क्षेत्रांशी जोडलेले आहे हे समजावून सांगितले. त्यामुळे ही कार्यशाळा विक्री व्यवस्थापनाचा सकारात्मक दृष्टिकोनातून विचार करण्यास प्रवृत्त करणारी ठरली.

(२) ३ सप्टेंबर २०११

**NATIONAL HR SUMMIT 2011 राष्ट्रीय मानव संसाधन विकास संमेलन २०११**

(HR at its Best) "उत्कृष्ट मानव संसाधन" या विषयावर आधारित या संमेलनामध्ये व्यवस्थापनात मानव संसाधनाचे योगदान औद्योगिक संस्थेच्या विकासाच्या दृष्टीने कसे महत्त्वाचे असते यावर चर्चा करण्यात आली.

(३) १ ऑक्टोबर २०११

**ANNUAL WORKSHOP MANAGEMENT OF MICRO, SMALL AND MEDIUM ENTERPRISES**

'व्यवस्थापन लघु आणि मध्यम उद्योगांचे या विषयावर आधारित कार्यशाळेचे आयोजन दरवर्षी प्रमाणेच या वर्षी देखील विद्यार्थ्यांना आणि शिक्षकांना एखाद्या

महत्वाच्या शैक्षणिक विषयावर आपले विचार, मते मांडण्याचे तसेच विविध शैक्षणिक कृती / कार्यक्रमांचे आयोजन करण्याची संधी मिळावी या हेतूने लघु व मध्यम उद्योगांचे व्यवस्थापन (MSME) या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.

आमच्या उद्योजक विभागातर्फे (e-cell) विद्यार्थ्यांनी काही लघु आणि मध्यम उद्योग संस्थाना प्रत्यक्ष भेट देऊन तेथे उद्योजकांच्या मुलाखती घेतल्या. त्या चित्रफिती देखील या कार्यशाळेत दाखवण्यात आल्या. जगातील इतर देशांमधील लघु उद्योग आणि भारतातील लघु उद्योग या संबंधी विवेचनही या कार्यशाळेत करण्यात आले.

श्री. सोएब फतेही, श्री. आर. शेषन आणि श्री. श्रीरंग देशपांडे या मान्यवरांनी परीक्षण करून आणि सादरीकरणा बाबतीत विद्यार्थ्यांना महत्वाचे सल्ले देऊन विजेत्या संघाची नावे घोषित केली ती खालील प्रमाणे -

प्रथम क्रमांक - उद्योजक विभाग (E-Genesis' Presentation)

द्वितीय क्रमांक - Operation शाखेच्या विद्यार्थ्यांना (Operations students' presentation)

तृतीय क्रमांक - वित्त शाखेच्या विद्यार्थ्यांना (Finance students' presentation) व्यवस्थापन लघु आणि मध्यम उद्योगांचे सारखा महत्त्वाचा पण दुर्लक्षित विषय निवडल्या बद्दल परीक्षकांनी संस्थेचे अभिनंदन केले.

### (४) १२ नोव्हेंबर २०११

**NATIONAL FINANCE SUMMIT राष्ट्रीय वित्त संमेलन**

उद्योग संस्था आणि शैक्षणिक संस्था यांच्या परस्पर अपेक्षां मधील तफावत दूर करण्याच्या हेतूने "FINANCE IN REEL AND REAL LIFE" ''वित्त व्यवस्था सैद्धांतिक आणि प्रत्यक्ष उद्योगातील'' या विषयावर आधारित संमेलनाचे आयोजन करण्यात आले.

### (५) १९ नोव्हेंबर २०११

**NATIONAL OPERATIONS SUMMIT 2011 राष्ट्रीय प्रचालन (Operations) संमेलन २०११**

(Operations) प्रचालन हा उत्पादन क्षेत्रातील कोणत्याही उद्योग व्यवस्थेचा महत्त्वाचा विभाग म्हणूनच या शाखेतील आधुनिक प्रवाहांबद्दल माहिती मिळविण्याच्या उद्देशाने विस्मयचकित करणारे प्रचालन (Operations) : नवनिर्मित पद्धतींचे ओझरते दर्शन (Amazing Operations: A Glimpse of Emerging Practices ) या विषयावर आधारित संमेलनाचे आयोजन केले गेले.

### (६) १९ नोव्हेंबर २०११

**ALUMNI MEET 2011 माजी विद्यार्थी संमेलन २०११**

या वर्षीच्या माजी विद्यार्थी संमेलनाचे उद्‌घाटन Dr. P.M. Kelkar, Dean DR VN BRIMS, Dr.Guruprasad Murthy, Director General DR. VN BRIMS आणि Dr. K. Surtanarayanan Director, DR. VN BRIMS, यांच्या हस्ते करण्यात आले. अनेक माजी विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमात आपल्या आठवणी ताज्या केल्या आपले विचार मांडून अनेक विषयावर चर्चा केली. तसेच या कार्यक्रमामध्ये माजी विद्यार्थ्यांनी संस्थेला उपयोगी अशा काही महत्वाच्या सूचना केल्या तसेच काही प्रस्ताव देखील मांडण्यात आले.

संमेलनाला उपस्थित राहिल्याबद्दल तसेच संस्थेच्या प्रगतीमध्ये निस्वार्थी भावनेने मदत करण्याची तयारी दर्शविल्याबद्दल विद्यमान विद्यार्थ्यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे

आभार मानले आणि पुन्हा भेटीच्या अश्वासनाने संमेलनाची सांगता झाली.

(७) ७ जानेवारी २०१२

**ICT SUMMIT 2012 माहिती संवाद तंत्रज्ञान संमेलन २०१२**

उद्योग संस्थामध्ये वापरले जाणारे अद्ययावत माहिती तंत्रज्ञान किंवा विविध उद्योग संस्थामध्ये वापरल्या जाणाऱ्या माहिती तंत्राज्ञानावर आधारित आधुनिक कार्यपद्धती या बद्दल विद्यार्थ्यांना तसेच शिक्षक वर्गाला माहिती करून देण्याच्या उद्देशाने ''सुरळीत कारभारासाठी / कार्य पद्धती साठी माहिती तंत्रज्ञानातील आधुनिक प्रवाह (Modern Trends of ICT for Functional Alignment) या विषयावर आधारित संमेलनाचे आयोजन करण्यात आले. या प्रसंगी माहिती तंत्रज्ञान (ICT) क्षेत्रातील काही मान्यवर तज्ज्ञांनी आपले विचार मांडले.

(८) २७-२८ जानेवारी २०१२

**CENTAURUS 2012 B SCHOOL EVENT 2012 सेंटारस वार्षिक मोहोत्सव २०१२**

या वर्षी दिनांक २७-२८ जानेवारी रोजी CENTAURUS 2012 या वार्षिक स्पर्धा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. दरवर्षी प्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांनी या स्पर्धा सोहळ्याच्या आयोजनात उत्साहाने भाग घेतला. या वर्षी स्पर्धांचे मुख्य ३ विभाग करण्यात आले. १) व्यवस्थापन विषयावरील स्पर्धा २) सांस्कृतिक स्पर्धा ३) क्रीडा स्पर्धा. या वर्षी सुमारे ३५-४० व्यवस्थापन शाळांनी या स्पर्धा कार्यक्रमात सहभाग घेतला.

(९) १०-११ फेब्रुवारी २०१२

MSMEs Exhibition & BMA-DR VN BRIMS Awards of Excellence Ceremony National Seminar on Management of Micro, Small and Medium Enterprises भारतीय उद्योग क्षेत्रात महत्त्वाचा परंतु दुर्लक्षित असा विभाग म्हणजे लघु व मध्यम उद्योगव्यवस्था क्षेत्र. या क्षेत्रातील काही समस्या आहेत तसेच; भारत सरकारने या क्षेत्रासाठी तरतूद म्हणून अनेक अनुदाने व योजना तयार करूनदेखील अनेक उद्योजकांना या बद्दलची माहितीच नसते ही माहितीची दरी भरून काढण्याच्या दृष्टीने डॉ. व्ही. एन. ब्रीम्स तर्फे ''लघु व मध्यम उद्योगांचे व्यवस्थापन'' या विषयावर २ दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले.

चर्चासत्राच्या पहिल्या दिवशी विषयाला अनुसरून लघुउद्योजकाच्या उत्पादनांचे एक प्रदर्शन भरवण्यात आले प्रदर्शनाचे उद्घाटन डॉक्टर विजय बेडेकर यांच्या हस्ते झाले.

(१०) १६-०३-२०१२

**Live Screening of UNION BUDGET 2012-13 अर्थसंकल्प २०१२-२०१३ : थेट प्रक्षेपण**

डॉ. व्ही. एन. ब्रीम्स आणि WIRC, Thane Branch of the Institute of Chartered Accountants of India (ICAI) यांच्या संयुक्त विद्यमाने अर्थसंकल्प २०१२-२०१३ : थेट प्रक्षेपण आणि संक्षिप्त चर्चा असा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यामध्ये सुरुवातीला डॉ. के. सूर्यानारायानन, Director, DR VN BRIMS यांच्या स्वागतपर भाषणानंतर डॉ. विजय बेडेकर, Chairman, Vidya Prasarak Mandal, Thane, CA जयदीप सहस्त्रबुद्धे, Chairman, WIRC, Thane Branch of ICAI, डॉ. गुरुप्रसाद मूर्ती, Director General, DR VN BRIMS या मान्यवरांनी अर्थसंकल्प आणि आपला अर्थसंकल्पाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, गत वर्षीचे अर्थसंकल्प आणि त्याचा आढावा, नवीन अर्थसंकल्पा बद्दल अपेक्षा, इत्यादी बाबत थोडक्यात आपापली मते मांडली.

यानंतर झालेल्या परिसंवादात विविध तज्ज्ञांनी ताज्या अर्थसंकल्पावर आपल्या प्रतिक्रिया दिल्या. प्रश्नोत्तराच्या फेरी नंतर आभार प्रदर्शनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

(११) २४-०३-२०१२

*Seminar on* **UNION BUDGET 2012-13**

दरवर्षी अर्थसंकल्प प्रकाशित झाल्यानंतर साधारण आठवड्यानंतर या नवीन अर्थसंकल्पाचा अभ्यास करून त्यावर एक चर्चासत्र आयोजित करण्यात येते. या वर्षीच्या कार्यक्रमात डॉ. के. सूर्यनारायनन, Director, DR VN BRIMS यांच्या उद्घाटनपर भाषणानंतर डॉ. विजय बेडेकर, Chairman, Vidya Prasarak Mandal, ठाणे यांनी आपले विचार मांडले व डॉ. गुरुप्रसाद मूर्ती, Director General DR VN BRIMS यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले.

**EXPERIENTIAL LEARNING PROGRAMME (अनुभवात्मक शिक्षण)**

आपण जो विषय, जी तत्वे, जे सिद्धांत, ज्या पद्धती शिकलो त्या प्रत्यक्षात वापरून पाहण्याची संधी अशी कार्यक्रमांतून विद्यार्थ्यांना मिळत असते. अभ्यासक्रमातले एखादे तत्व आपण जेव्हा प्रत्यक्ष प्रयोगात वापरून पाहतो ते आपल्याला जास्त चांगल्या प्रकारे समजते तो अनुभव आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावणारा ठरतो. म्हणूनच पुढील विषयांवर आधारित काही कृती कार्यक्रमांचे आयोजन आमच्या विद्यार्थ्यांसाठी या सत्रात करण्यात आले.

- पद्धतशीर विचारसरणी (Systematic Thinking) - 25th Aug. 2011
- संघ बांधणी आणि संघकार्य (Team Building & Team Work) - 10 & 12 Sept 2011 (Interpersonal Skills) 17th Sept 2011
- उच्च कार्यक्षम संघ (High Performance Team) - 20th Sept 2011
- वाद/मतभेद व्यवस्थापन पद्धती (Conflict Management Styles) 24 th & 31st SEpt. 2011
- नेतृत्वकौशल्य (Leadership) 28th Sept 2011
- तणाव व्यवस्थापन (Stress Management) 30th Sept. 2011
- दृष्टिकोन(Perception) 5th Oct 2011
- नेतृत्व आणि संघ विकास (Leadership & Team Development) 7th & 14th Oct 2011
- वाद व्यवस्थापन आणि अनुयोजन (Conflict Management & Coping) 4th Now 2011
- नवप्रवर्तन आणि उद्योजकता (Innovation & Entrepreneurship) 16th & 17th Dec 2011

## तंत्रनिकेतन वार्ता

**Innovision - वार्षिकाचे प्रकाशन**

विद्या प्रसारक मंडळाच्या तंत्रनिकेतनच्या 'Innovision' या वार्षिकाचे प्रकाशन दि ३१ मार्च २०१२ रोजी मा. मी. एस. एस. शशीधरा (डेप्युटी सेक्रेटरी, MSBTE मुंबई) यांचे शुभहस्ते करण्यात आले. वार्षिकाचा प्रकाशन सोहळा बाजीराव पेशवे सभागृह कॅम्पस, ठाणे येथे झाला. वि. प्र. मंडळाचे प्राचार्य दि कृ. नायक, 'Innovision' च्या संपादिका प्रा. सौ. वैशाली सोनावणे संघटक ग्रंथपाल सौ. बी. ए. जोशी इत्यादी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते.


कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुण्यांच्या आणि मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने करण्यात आली. प्रसंगी विद्यार्थ्यांनी स्वागतगीत गायले. त्यानंतर प्राचार्य दि. कृ.

नायक यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांनी वार्षिकाच्या संपादनाकरिता कराव्या लागणाऱ्या तयारीची प्रशंसा केली. संपादक मंडळींना त्यांनी विशेष धन्यवाद दिले. त्यानंतर प्रमुख पाहुणे आणि मान्यवरांना पुष्पगुच्छ देवून त्याचे स्वागत करण्यात आले. गतवर्षी नेहमी 'Polyzine' या नावाने निघणाऱ्या वार्षिकाचे नाव बदलून 'Innovision' असे सुचविण्यात आले. त्यासाठी या वर्षी अनेकांच्या कल्पना मागविण्यात आल्या होत्या. त्या सर्वांच्या कल्पनेमधून प्रा. सौ. उषा राघवन यांनी सुचविलेल्या शीर्षकाबद्दल त्यांचा प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सत्कार करण्यात आला. व आत्ता 'Polyzine' या वार्षिकाला यापुढे 'Innovision' असे संबोधण्यात येईल.

प्रमुख पाहुण्यांचा परिचय प्रा. सौ. उषा राघवन यांनी उपस्थितांना करुन दिला. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना पारितोषके प्रदान करण्यात आली. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांच्या आणि मान्यवरांच्या हस्ते 'Innovision' या वार्षिकाचे प्रकाशन करण्यात आले. वार्षिक हे वेळेत प्रकाशित केल्याबद्दल आणि काही महत्वाच्या सूचना करुन त्यांनी आपले विचार उपस्थितांना ऐकवले. मासिकामध्ये व्यक्त केलेल्या साहित्याबद्दल ही त्यांनी समाधान व्यक्त केले. त्यानंतर प्रमुख पाहुण्यांना प्राचार्य दि. कृ. नायक यांचे हस्ते भेट वस्तू देण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. मिस्त्री मॅडम यांनी केले. उपस्थितांचे आभार प्रदर्शन सौ. सोनावणे मॅडम यांनी मानले.

कार्यक्रमाची सांगता प्रा. सौ. किर्ती अगाशे यांनी सादर केलेल्या पसायदानाने झाली.



**'Innovision' या वार्षिकाचे प्रकाशन करताना डावी कडून सौ. वैशाली सोनावणे (Innovision संपादक) प्राचार्य दि. कृ. नायक (वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतन ठाणे) प्रमुख पाहुणे श्री. एस. एम एस शशीधरा (डेप्युटी सेक्रेटरी MSBTE, मुंबई) सौ. भारती अ. जोशी (समन्वयक, Innovision)**

**प्रकल्प प्रदर्शन २०११ -२०१२**

वि. प्र. मंडळाचे, तंत्रनिकेतनमध्ये तृतीय वर्षात शिकत असलेल्या इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स या शाखेतील विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या ग्रुप प्रकल्पाचे प्रदर्शन दि. १७/०३/२०१२ रोजी भरविण्यात आले होते. प्रकल्प तयार करणाऱ्या गटातील विद्यार्थ्यांचे नाव, प्रकल्प शीर्षक व मार्गदर्शकाचे नावे खालील प्रमाणे -

| ग्रुप नं. | विद्यार्थ्यांची नावे | प्रकल्पाचे नाव | मार्गदर्शकाचे नाव |
|---|---|---|---|
| १) | नावर श्रद्धा त्रिंबक<br>नारकर तेजस विजय<br>पाटकर ऐश्वर्या सुनिल<br>पाटील परेश सुरेश | Micro Controller based Infrared Remote Process Control | सौ. जे. साजी |

| | | | |
|---|---|---|---|
| २) | देशमुख स्वप्नील सुधीर<br>म्हात्रे निशांत वसंत<br>शेडगे स्वप्नील रमेश<br>माल्सुरे गणेश अंकुश | Mobile battery charging using coin | सौ. गौरी दुसाने |
| ३) | भोईर अनुराग विजय<br>तडवलकर पुरकर सुरेश<br>बेरा नोबीन सदाशिव<br>मशेरे स्वप्नील रामकृष्ण | Automatic Room Light Controller | सौ. के. एस. अगाशे |
| ४) | शिरवाडकर निखिल शशीकांत<br>तप्नेकर सिद्देश सुरेंद्र<br>गुरव रोशन शाम<br>लिंगवत नयन गणपत | Digitized Can Number Plates with GPS | कु. अनुश्री शेगॉंय |
| ५) | पाटील चिराग शरद<br>साळवे संकेत दत्ता<br>पवार साईराज मारुती<br>शिंदे चेतन संजीव | Automatic speed Controller | सौ. सांधी एम. एल. |
| ६) | गायकवाड मयूर अरुण<br>सामविलकर जासीम प्रतीक<br>शुल्क विश्व प्रकाश एस. पी.<br>तांबोडी गौरव सुनिल<br>पाटील नंदन मोहन | Military Robot | सौ. के. एस. अगाशे |
| ७) | फालके प्रियांका सुरेश<br>गावडे क्रांती चंद्रकांत<br>ढवण प्रियांका नामदेव<br>शिन्दे भक्ती हेमंत | Automatic Plant Irrigation | कु. अनुश्री शेगॉंय |
| ८) | अंधाळे सोनल सतीश<br>भोसले शीतल दत्तात्रय<br>बोडके आरती भरत<br>दातीर नर्मता प्रल्हाद | Electronic Voting Machine | सौ. गौरी दुसाणे |

| | | | |
|---|---|---|---|
| ९) | कदम पंकज गोविंद<br>कुंभार किरण गगन्नाथ<br>गोसावी आदिती रामदास<br>गंधरे अंकित संदीप | RFID based attendance system | सौ. सारिका कोन्हाडे |
| १०) | भुताडा प्रतिक मुरलीधर<br>सैनी तापीश अनिल<br>शेळके सागर संदीप | SMS based Electrical Appliances Control | सौ. सांथी एम. एल. |
| ११) | ऐनिकदन ईराने वासी<br>चौधरी सुरभी दुर्गेश<br>सागवेकर प्रियांका सी. | Programmable Numerical lock system | सौ. सारिका कोन्हाड |
| १२) | उतेकर निखिल परशुराम<br>गायकवाड अनिकेत दशरश<br>सावंत ओंकार किशोर<br>सिंग मयुर लल | Cellphone Operated Land Rover | सौ. जे. साजी |
| १३) | रकीबे अतुल पंड<br>कांबळे प्रणिता शशीकांत<br>मांगले स्नेहा सुरेश<br>मुळये तन्मय हेमंत | Remote Operated SPY | कु. अमिशा मिस्त्री |
| १४) | धोंडे मयुरेश दिपक | Dual Power Supply | सौ. के. एस. अगाशे |

वरील प्रकल्प प्रदर्शन तंत्रनिकेतनच्या इंडस्ट्रीयल इलेक्ट्रॉनिक्स विभागात भरविण्यात आले होते.

**मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स**

वि. प्र. मंडळाचे तंत्रनिकेतनमध्ये तृतीय वर्षात शिकत असलेल्या मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स या शाखेतील विद्यार्थ्यांनी त्यांनी तयार केलेल्या प्रकल्पाचे प्रदर्शन दि. ३ मार्च २०१२ रोजी भरविण्यात आले होते. हे प्रदर्शन मेडिकल इलेक्ट्रॉनिक्स विभागामध्येच भरविण्यात आले होते. प्रकल्प तयार करणाऱ्या विद्यार्थ्यांचे नाव, प्रकल्पाचे शीर्षक, व त्यांना मागदर्शन करणाऱ्या मार्गदर्शकांची नावे खालील प्रमाणे

| ग्रुप नं. | विद्यार्थ्यांची नावे | मार्गदर्शकाचे नाव | प्रकल्पाचे शीर्षक |
|---|---|---|---|
| १) | पूजा गांधी<br>प्रिया गांधी<br>मंदार दातीर<br>मंगेश कल्याणकर | श्री. टी. व्ही. मोहिते पाटील | Ultrasound blind man stick |

| | | | |
|---|---|---|---|
| २) | मनोज सरक<br>मनोज कुभारे<br>गायत्री जोशी<br>अभय कोलसकर | सौ. अर्चना मोहिते | Pulse rate meter |
| ३) | आदेश ठाणेकर<br>ऋषीकेश अहिरे<br>स्वप्निल उमरेकर<br>महेश सातवेकर | कु. मधुरा खरे | Electro surgical unit |
| ४) | अदिती काणे<br>अनुश्री चव्हाण<br>नेहा शिर्के | श्री. टी. व्ही. मोहिते पाटील | Heart rate Variability using respirator |
| ५) | नितांत कारखानीस<br>तेजस बंडाबे<br>हर्षल हुमाणे<br>भूपींदर सिंग | सौ. अर्चना मोहिते | Temperature Controller |
| ६) | पूजा दळवी<br>अर्चना कोरगांवकर<br>नमिता बोकाडे<br>प्रियंका वाघ | सौ. ग. अ. पुजारे | Nerve stimulates |
| ७) | हिमानी खडेप<br>प्रणाली कुबल<br>दिपाली अहिराव<br>भरत गोराड<br>दिपक पाभळे | सौ. शीतल म्हात्रे | Ultrasound motion detector |
| ८) | दक्षक केळस्कर<br>महेश कमलास्कर<br>अनूज चीपकर | सौ. ग. अ. पुजारे | Dental x-ray machine |
| ९) | शीतल निगूत<br>स्नेहा रेपाले | कु. मुग्धा जोशी | Blood Infusion warmer |

| | | | |
|---|---|---|---|
| | रोहिणी निनावे<br>सिद्धी तुळकर | | |
| १०) | प्रियंका दलाल<br>प्रतीक्षा बढे<br>धनश्री चौधरी | सौ. शीतल म्हात्रे | Smart Wheel Chair |

## विद्या प्रसारक मंडळ

कै. डॉ. वा. ना. बेडेकर यांचा ८ वा स्मृतिदिन शनिवार दिनांक १४.०४.२०१२ रोजी झाला. या स्मृतिदिना निमित्त दरवर्षीप्रमाणे यंदाही सत्कर्म प्रतिष्ठान, ठाणे, तर्फे शनिवार दि. १४.०४.२०१२ रोजी सायं. ६.३० वाजता गरजू विद्यार्थ्यांना आर्थिक मदत, वैयक्तिक गौरव आणि भारतीय संस्कृतीवर आधारीत ''भूपाळी ते भैरवी'' हा कार्यक्रम आयोजित केला गेला. सदर कार्यक्रम विद्या प्रसारक मंडळाच्या महाविद्यालय परिसरातील थोरले बाजीराव पेशवे सभागृहात झाले.

यापूर्वी सकाळी स्मृतीदिनानिमित्ताने डॉ. मधुकर ढवळीकर यांचे व्याख्यान झाले.

यापूर्वी झालेली व्याख्याने व त्यांचे विषय -

**२००५ प्रथम स्मृतीदिन:**
विषय: भारत आणि संगणक **वक्ता** : डॉ. दीपक फाटक

**२००६ द्वितीय स्मृतीदिन :**
विषय : जागतिक अर्थकारणात आशियाई वर्चस्वासाठी शिक्षणाचे महत्त्व **वक्ता** : प्रा. वाय. के. भूषण

**२००७ तृतिय स्मृतीदिन:**
विषय: जागतिकीकरण आणि भारतीय अर्थकारण - परिणाम आणि दिशा **वक्ता:** डॉ. विष्णू कान्हेरे

**२००८ चतुर्थ स्मृतीदिन:**
विषय : भारतीय दर्शनशास्त्रामधील घटितार्थशास्त्र आणि विरचना **वक्ता** : डॉ. आर. बाल्सुब्रमनियन

**२००९ पाचवा स्मृतीदिन :**
विषय: विज्ञान आणि समाज : वसाहतवादाच्या पार्श्वभूमिवर घ्यायचा बोध **वक्ता** : डॉ. दीपक कुमार

**२०१० सहावा स्मृतीदिन:**
विषय: ऐतिहासिक दृष्टीकोनातून भारतीय विज्ञान व धर्म
**वक्ता** : प्रा. बी. व्ही. सुब्बारायप्पा

**२०११ सातवा स्मृतीदिन:**
विषय: शैक्षणिक उत्तमतेकरिता स्वायत्ततेची गरज?
**वक्ता** : प्रा. राम ताकवले

**२०१२ आठवा स्मृतीदिन:**
विषय: महाराष्ट्राची सांस्कृतिक जडणघडण - पुरातत्वीय पुरावा **वक्ता** : डॉ. मधुकर केशव ढवळीकर

●●●

**दिशा संपर्क दूरध्वनी**
**०२२-२५४२ ६२७०**

# विद्या प्रसारक मंडळाचे स्वप्न

वेळणेश्वर पाहिलं,
ऐकली गाण समुद्राची.
परशुरामाने कोकण निर्माण केलं ...
त्याचाच आवाज तो
या सर्वांशी नातं जोडलं
आमच्या विद्या प्रसारक मंडळाने
टाकत दोन पावले पुढे
ओळखून गरज काळाची
परशुरामाच्या हातातील परशु घेत
घातला घाव कोकणच्या कातळावर
आणि सुरू झाली कहाणी
विराट स्वप्न प्रत्यक्षात येण्याची ...
अभियांत्रिकी गुरुकुलाची ओळखत गरज
वर्तमानाचे आरोग्य जपणाऱ्या आमच्या डॉक्टरांनी
स्टेथोस्कोप लावला कोकणाच्या मातीला
तिची नाडी ओळखत
केली धडपड सुरू
डॉक्टरांची विजय मिळवणारी [illegible]
समुद्रही घाबरला.
आता आपला प्रतिस्पर्धी समोर आहे
असा विचार करत, क्षणभर थरारला ...

\- माधवी पाठक

